महाराष्ट्र शासन

## ग्राम विकास व पंचायत राज विभाग

## राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण




# महा आवास

### त्रैमासिक



महा आवास अभियान २०२३-२४ राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळे प्रसंगी मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री.गिरीष महाजन यांचे स्वागत करतांना मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.एकनाथ डवले




महा आवास अभियान २०२३-२४ राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळे प्रसंगी मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.एकनाथ डवले यांचे स्वागत करतांना मा.संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे




महा आवास अभियान २०२३-२४ राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळे प्रसंगी मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री.गिरीष महाजन उपस्थितांना मार्गदर्शन करतांना




महा आवास अभियान २०२३-२४ राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळे प्रसंगी मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.एकनाथ डवले प्रास्ताविक सादर करतांना

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# ग्राम विकास विभाग

## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

## महा आवास

| | |
|---|---|
| मार्गदर्शक | श्री. एकनाथ डवले, भा.प्र.से.<br>प्रधान सचिव,<br>ग्राम विकास व पंचायत राज विभाग |
| मुख्य संपादक | डॉ. राजाराम दिघे,<br>संचालक,<br>राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण |
| प्रबंध संपादक | नीलेश काळे, उप संचालक<br>राजलक्ष्मी येरपुडे, उप संचालक<br>अपर्णा पाटणे, सहा. संचालक (लेखा) |
| कार्यकारी संपादक | दिनेश मोवळे,<br>राज्य माहिती, शिक्षण व संवाद तज्ञ |
| सहयोगी संपादक | डॉ. संघरत्न सोनवणे<br>राम आघाव<br>परमेश्वर शेलार<br>माधुरी चौधरी |
| मुख्यपृष्ठ मांडणी व सजावट | दिनेश मोवळे,<br>राज्य माहिती, शिक्षण व संवाद तज्ञ |
| संपादकीय पत्ता | संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-<br>ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय<br>४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन,<br>सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४ |
| संकेत स्थळ | www.pmayg.nic.in<br>www.mahaawaas.org |
| ईमेल | directoriayruralhousing@gmail.com |
| दूरध्वनी क्रमांक | ०२२ - २७५६१८२४ |

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | संपादकीय | १ |
| २ | विशेष - महा आवास अभियान २०२३-२४ | ३ |
| ३ | महा आवास अभियान २०२३-२४ बाबत मान्यवरांचे संदेश | ५ |
| ४ | विविध उपक्रमांचा मागोवा<br>क्षमता बांधणी उपक्रम | ८ |
| | संनियंत्रण व मूल्यमापन उपक्रम | १२ |
| | माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम | १६ |
| | समन्वय उपक्रम | १८ |
| | केंद्र व राज्य सरकार यांना ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासंबंधित पॉलिसी इनपुट | २० |
| ५ | ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा संचित प्रगती अहवाल<br>प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण | २१ |
| | रमाई आवास योजना | २२ |
| | शबरी आवास योजना | २३ |
| | पारधी आवास योजना | २४ |
| | आदिम आवास योजना | २५ |
| | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना | २५ |
| | यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना | २६ |
| | मोदी आवास घरकुल योजना | २७ |
| ६ | ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रम/ यशोगाथा | २८ |
| ७ | फोटो गॅलरी | ३४ |
| ८ | मिडिया कवरेज | ३५ |


वर्ष ४ थे । अंक १४ वा । ऑक्टोबर ते डिसेंबर २०२३

महा आवास हेल्पलाईन क्रमांक - १८०० २२ ०१९



**डॉ. राजाराम दिघे**
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण**

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२३ या सरत्या वर्षाच्या शेवटच्या अंकाच्या माध्यमातून आपणांसोबत संवाद साधताना मला आनंद होत आहे. सरत्या वर्षामध्ये आपण ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या माध्यमातून लाखो लोकांना हक्काचा निवारा उपलब्ध करून दिला. त्याचबरोबर हजारो भूमिहीन लाभार्थ्यांना शासनाच्या वेगवेगळया योजनांच्या माध्यमातून जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामपंचायतस्तरावरील माझ्या सर्व सहकार्यांचे मी अभिनंदन करतो.

मागील वर्षामध्ये आपण राबविलेल्या अमृत महा आवास अभियानामध्ये घरकुल बांधकामासोबत अनेक नाविन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी केली. याचा फायदा लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यास होत आहे. असे असले तरी राज्यामध्ये केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत आवास योजनांमधील भूमिहीन लाभार्थी, मंजूरी बाकी असलेले, मंजूरी दिलेले परंतू अपुर्ण घरकुले पुर्ण करण्याचे मोठे उद्दिष्ट शिल्लक आहे. ही कामे गतिमानतेने व गुणवत्तापुर्ण होण्यासाठी तसेच ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात नाविन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी, लाभार्थ्यांना मुलभूत नागरी सुविधा देणे, कृती संगमातून विविध शासकीय योजनांचा लाभ देणे व सर्व भागधारकांच्या क्षमता बांधणीसाठी मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज व मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्या संकल्पनेतून महा आवास अभियान राबविण्याचा व त्याला मूर्त स्वरूप देण्याचा निर्णय घेण्यात आला. यामध्ये मा. प्रधान सचिव यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

महा आवास अभियान २०२३-२४ राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळा व महा आवास अभियान टप्पा 2 मध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार वितरण समारंभ मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज यांच्या शुभहस्ते व मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्या प्रमुख उपस्थित करण्यात आला. याप्रसंगी मा. मंत्री ग्राम विकास व पंचायत राज यांनी घरकुल बांधकामामध्ये राज्य देशामध्ये पहिल्या क्रमांकावर आणणार असल्याचे सांगितले तसेच या अभियानामध्ये ७ लाख घरकुले पुर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले असल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांनी अभियानास शुभेच्छा देत अभियान कालावधीत घरकुले भौतिकदृष्टया पुर्ण करण्याबरोबरच आर्थिकदृष्ट्याही पुर्ण करण्यावर भर देण्याचे यावेळी सांगितले.

मागील तीन अभियानाच्या अनुभवातून व मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायतराज यांच्या संकल्पनेतून या अभियानामध्येही विविध उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. जसे की, भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देणे, उर्वरीत घरकुलांना मंजूरी देणे, मंजूर घरकुलांना सर्व हप्त्यांचे वितरण करणे, घरकुले भौतिकदृष्ट्या पुर्ण करणे, ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करणे, प्रलंबीत घरकुले पुर्ण करणे, बहुमजली इमारती, गृहसंकुले व हाऊसिंग अपार्टमेंटची उभारणी करणे, डेमो हाऊसचा वापर करणे, सामाजिक अंकेक्षण करणे, Area Officer App चा वापर करणे, केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा कृतीसंगम करणे. बरोबरच नाविन्यपुर्ण उपक्रमांचाही यामध्ये समावेश करण्यात आला आहे. या अभियानातही आपण हिरीरीने भाग घेऊन आपल्या जिल्हा, तालुका व ग्रामपंचायतीस पुरस्कार प्राप्त करण्यासाठी प्रयत्नशील राहाल ही अपेक्षा.

या अंकामध्ये महा आवास अभियानाच्या माध्यमातून मा. मंत्री, मा. पालमंत्री यांच्या उपस्थिती तसेच मा. लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावरील कार्यशाळांचा मागोवा घेण्यात आला असून यामध्ये प्रामुख्याने धुळे, पालघर, अमरावती, गडचिरोली, सांगली, येथील कार्यशाळांचे वृत्तांकन करण्यात आले आहे.

दरम्यानच्या काळामध्ये मा. प्रधान सचिव ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्या अध्यक्षतेखालील झालेल्या अभियानाच्या आढावा बैठकांचे वृत्तांकन करण्यात आले आहे. तसेच मी स्वतः अभियानाच्या उपक्रमनिहाय

आढावा बैठका घेऊन अभियानाला या माध्यमातून गति प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

ग्रामीण विकास मंत्रालय भारत सरकार यांनी दरम्यानच्या काळामध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधील अपुर्ण घरकुले पुर्ण करण्याबाबत सातत्याने पाठपुरावा सुरू केला असून सर्व घरकुले माहे डिसेंबर २०२३ पर्यंत पुर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. त्या अनुषंगाने केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्याच्या सातत्याने बैठकांचे आयोजन केले. याचेही वृत्तांकन सदर अंकामध्ये करण्यात आले आहे. याचाच भाग म्हणून मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांनी विविध जिल्ह्यांमध्ये घरकुलांना भेटी दिल्याचेही वृत्तांकन करण्यात आले आहे. तसेच राज्यातील नांदेड, सांगली, नंदूरबार जिल्ह्यामध्ये जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांमार्फत घरकुले पुर्ण करण्यासाठी राबविण्यात आलेल्या नाविन्यपुर्ण बाबींचाही समावेश या अंकामध्ये करण्यात आला आहे.

राज्यामध्ये इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग तसेच विमुक्त जाती व भटक्या जमातींसाठी सुरू करण्यात आलेल्या मोदी आवास घरकुल योजने अंतर्गत सन २०२३-२४ साठी राज्यास ३ लाख घरकुलांचे उद्दिष्ट इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत प्राप्त झाले असून सदरचे उद्दिष्ट जिल्हानिहाय आपण वितरीत करण्यात आले आहे. मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांनी सर्व विभागीय आयुक्त व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना घरकुल मंजूरी व पहिला हप्ता वितरणाचा कालबद्ध कार्यक्रम (Time Bound Programme) आखून दिला आहे. त्यानुसार मंजूरीची प्रक्रिया १५ नोव्हेंबर पर्यंत पुर्ण करून लाभार्थ्यांना २० नोव्हेंबर पर्यंत पहिला हप्त्याचे वितरण करावयाचे होत. तरी केवळ २० टक्के लाभार्थ्यांनाचा आपण मंजूरी देऊ शकलो आहे. मंजूरीसाठी येणाऱ्या जात प्रमाणपत्रांच्या अडचंणीबाबत आपण संबंधीत विभागांनी लक्ष द्यावे यासाठीचाही पाठपुरावा सुरू केला आहे. मंजूरीच्या प्रक्रियेमध्ये आपणास गति प्राप्त करणे आवश्यक उपाय योजना करणे गरजेचे आहे.

केंद्र शासनाने प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM-JANMAN) या नवीन योजनेची सुरूवात केली. या योजनेची पार्श्वभूमी अशी की, मा.प्रधानमंत्री महोदय यांनी दि. १५ नोव्हेंबर, २०२३ रोजी जनजाती गौरव दिनाचे औचित्य साधून प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महा अभियान (P M - JANMAN) राबवण्याची घोषणा केली. यामध्ये भारतातील १८ राज्यातील ७५ विशेषतः असुरक्षित आदिवासी गट (PVTGs) आहेत. महाराष्ट्रामध्ये या ७५ पैकी कोलाम, कातकरी व माडीया गोंड या तीन PVTGs आहेत. यासाठी ९ मंत्रालयांद्वारे ११ विशेष बाबींवर लक्ष केंद्रित करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महा अभियान (PM-JANMAN) अंतर्गत देशात आदिम जमातीतील पात्र कुटुंबांसाठी ४.९० लाख लाभार्थ्यांना मुलभूत सुविधांसह पक्की घरे बांधण्यासाठी रु.२.३९ लाख प्रती घरकुल (घरकुल रू.२ लाख, स्वच्छ भारत मिशन (ग्रा) रु.१२ हजार मनरेगा अंतर्गत ९०/९५ दिवसांचे अकुशल वेतन रु. २७ हजार अंदाजे अनुदान) अशी तरतूद केली आहे.

या अभियानांतर्गत आदिवासी विकास मंत्रालय, भारत सरकार आणि ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी महाराष्ट्रातील चंद्रपूर, नांदेड, नाशिक, पालघर, पुणे, रायगड, रत्नागिरी, सातारा, सिंधुदूर्ग, ठाणे व यवतमाळ या ११ जिल्ह्यांमधील अधोरेखित केलेले ४९ तालुके व ६९९ ग्रामपंचायतींमध्ये १६,०१९ लाभार्थी असल्याचे कळविले आहे. प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM-JANMAN) राबविण्याचा विस्तृत कृति आराखडा तयार करण्यासाठी दि. १५ डिसेंबर, २०२३ या दिवशी भारत मंडपम, दिल्ली येथे मंथन शिबीराचे आयोजन केले होते. यामध्ये प्रत्येक विभागाचा विस्तृत कृती आराखडा तयार करण्यात आला. सदर मंथन शिबीरास मी उपस्थित होतो. त्या अनुषंगाने आपणास सदर अभियान वेळेत पुर्ण करण्याठी कालबद्ध कार्यक्रमाद्वारे काम करणे आवश्यक आहे.

या अकांमध्ये मागील अंकाप्रमाणे यशोगाथा, मुख्य कार्यकारी अधिकारी, स्थानिक अधिकारी पदाधिकारी यांच्या बैठका, क्षेत्रीय भेटी, राज्यस्तरावरून राबविण्यात आलेल्या मोहिमा, सर्व योजनांचा संचित प्रगती अहवाल तसेच विभागनिहाय यशोगाथा यांचा समावेश करण्यात आला आहे. मागिल अंकाप्रमाणे हा अंकही आपणास नक्कीच आवडेल या अपेक्षेसह व अनेक शुभेच्छांसह!

**डॉ. राजाराम दिघे**
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण**

# महा आवास अभियान २०२३-२४

**"सर्वांसाठी घरे-२०२४"** हे केंद्र शासनाचे महत्वाचे धोरण असून राज्य शासनाने देखील या धोरणाचा स्विकार केला आहे. या अनुषंगाने राज्यात राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या माध्यमातून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, मोदी आवास घरकुल योजना अशा विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना तसेच त्यांना पूरक पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, ग्रामीण भागातील अतिक्रमण नियमानुकूल करणे अशा विविध योजना राबविण्यात येत आहे.

या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे व गुणवत्ता आणणे या हेतूने महाराष्ट्र राज्यात **दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ ते दिनांक ३१ मार्च २०२४ या कालावधीत "महा आवास अभियान २०२३-२४"** राबविण्यात येत आहे.

## -: अभियान राबविण्याचे उद्देश :-

i. राज्यात ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे.

ii. ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये शासकीय यंत्रणा व पंचायतराज संस्था यांचेबरोबरच समाजातील सर्व घटक जसे- स्वयंसेवी संस्था (लायन्स क्लब, रोटरी क्लब, इ.), सहकारी संस्था (साखर कारखाने, दुधसंघ, इ.), खासगी संस्था (Corporates), तंत्र शिक्षण संस्था (IITB, COEP, VNIT, इ.), बँका, लोकप्रतिनिधी, लाभार्थी, ग्रामस्थ, इ. भागधारकांचा सक्रीय सहभाग वाढविणे.

iii. राज्यात ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील भागधारकांची क्षमताबांधणी व जन-जागृतीद्वारे लोक चळवळ उभी करणे.

iv. ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या विविध योजनांचा कृतिसंगम (Convergence) घडवून आणणे.

v. ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रामध्ये नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून घरांचा दर्जा व गुणवत्ता वाढविणे.

## -: अभियान कालावधीत राबवावयाचे उपक्रम :-

### i. भूमीहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे:-

ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत गरजू, पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यासाठी **पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना**, शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करण्याची योजना, ग्रामीण भागातील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची योजना व इतर मार्ग – उदा. बक्षीसपत्र, संमतीपत्र, भाडेपट्टा, इ. प्रभावीपणे राबवून उर्वरित सर्व भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देणे.

### ii. घरकुलांना उद्दिष्टांप्रमाणे १०० टक्के मंजूरी देणे:-

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, मोदी आवास घरकुल योजना या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत जिल्ह्यांना वितरीत करण्यात आलेल्या घरकुल उद्दिष्टांनुसार १०० टक्के लाभार्थ्यांना मंजूरी देणे आणि लाभार्थ्यांच्या सक्रीय सहभागासाठी लाभार्थी मेळाव्याचे आयोजन करणे. लाभार्थ्यांना **घरकुल मंजूरीचे पत्र** त्वरीत वितरण, भूमिपूजन कार्यक्रम आयोजित करुन घरकुल बांधकामाबाबत तांत्रिक मार्गदर्शन व **बांधकाम सुरु करणे.**

### iii. मंजूर घरकुलांना सर्व हप्ते वेळेत वितरीत करणे:-

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, मोदी आवास घरकुल योजना या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत मंजूर घरकुलांना **पहिल्या हप्त्याचे वितरण ७ दिवसांत तर** पुढील हप्ते घरकुलांच्या भौतिक प्रगतीनुसार विनाविलंब वितरीत करणे. लाभार्थ्यांच्या सक्रीय सहभागासाठी स्थानिक स्तरावर **हप्ते वितरण कार्यक्रमाचे आयोजन** करणे.

### iv. सर्व मंजूर घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करणे:-

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त



वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, मोदी आवास घरकुल योजना या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत सर्व मंजूर घरकुलांचे काम भौतिकदृष्ट्या पूर्ण करणे. यामध्ये लाभार्थ्यांच्या सक्रीय सहभागासाठी त्यांच्या बैठका/ मेळावे घेणे, सरपंच, ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कर्मचारी, महिला स्वयंसहाय्यता गट, अंगणवाडी कर्मचारी, आशा कर्मचारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, इ. यांनी घरकुलांना वेळोवळी भेटी देणे व मंजूर केलेली सर्व घरकुले किमान कालावधीत व गतीने पूर्ण करणे.

### v.प्रलंबित घरकुले (Delayed Houses) पूर्ण करणे:-

प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत घरकुलांना पहिला हप्ता प्रदान केल्यापासून १२ महिन्यापेक्षा जास्त कालावधी झालेली, मात्र अद्यापपर्यंत अपूर्ण असलेली प्रलंबित घरकुले (Delayed Houses) प्राधान्याने पूर्ण करणे. यासाठी प्रलंबित घरकुलांच्या यादीनुसार घरकुले प्रलंबित राहण्यामागची कारणे शोधून त्या **कारणांचे विश्लेषण करुन त्यावर उपाययोजना करून सदर घरकुले पूर्ण करणे**, याकामी गरजेप्रमाणे तालुका कायदेविषयक सहाय्य व सल्ला समितीच्या सहाय्याने '**लोक अदालत**' वा इतर मार्गाने लाभार्थ्यांना घरकुल पूर्ण करण्यासाठी प्रवृत्त करणे. तसेच पूर्ण होऊ न शकणारी प्रलंबित घरकुले प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या मार्गदर्शक सूचनांनुसार Refund करुन Remand करणे व **यापुढे प्रलंबित घरकुलांच्या यादीमध्ये नविन घरकुलांचा समावेश होणार नाही याची दक्षता घेणे**.

### vi.ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करणे:-

घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्दिष्ट हे प्रशिक्षण देणाऱ्या संस्था (Training Provider) यांच्याशी समन्वय ठेवून पूर्ण करुन **त्यांचे मुल्यांकन**(Assessment) **त्वरीत पूर्ण करुन घेणे** व सदर माहिती आवास सॉफ्टवर अद्ययावत होईल याची खात्री करणे. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत प्रलंबित घरकुले (Deleayed Houses) प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी ग्रामीण गवंडी प्रशिक्षणाचा उपयोग करून घरकुले पूर्ण करणे. तसेच प्रशिक्षित ग्रामीण गवंडी व ग्रामपंचायत क्षेत्रातील इतर उपलब्ध गवंडी यांची ग्रामपंचायतनिहाय यादी तयार करुन त्यांचे पॅनेल बनविणे व या **पॅनेलमधील गवंड्यांचा ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील घरकुलांच्या बांधकामात सहभाग घेणे**.

### vii.बहुमजली इमारती, गृहसंकुले व हाऊसिंग अपार्टमेंटची उभारणी करणे:-

जागांची कमतरता व जागांच्या किमती यांचा विचार करून कमी जागेत जास्त लाभार्थी सामावण्यासाठी लाभार्थ्यांना मार्गदर्शन करून, प्रवृत्त करून एकत्र आणणे व त्यांच्या एकत्रित निधीतून जागा खरेदी करणे व त्याद्वारे त्यांच्या बहुमजली इमारती, गृहसंकुले व अपार्टमेंट द्वारे घरांचे स्वप्न पूर्ण करणे. अशा लाभार्थ्यांच्या राज्यात **प्रत्येक जिल्हा परिषद गटामध्ये** प्रत्येकी किमान एक याप्रमाणे **बहुमजली इमारती** (G + 1 ते 4), **गृहसंकुले व हाऊसिंग अपार्टमेंट** उभारणे.

### viii.डेमो हाऊसचा प्रभावी वापर करणे :-

घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत तालुका व जिल्हा स्तरावर डेमो हाऊसची निर्मिती करण्यात आली आहे. ही सर्व तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय डेमो हाऊसेस किरकोळ कामांसह पूर्ण झाल्याची खात्री करणे. लाभार्थ्यांना मार्गदर्शनासाठी जिल्हास्तरीय डेमो हाऊसेस, तालुकास्तरीय डेमो हाऊसेसला लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष भेटी आयोजित करुन ग्रामपंचायत स्तरावरील डेमो हाऊस मॉडेल लाभार्थ्यांस वेळोवेळी दाखवून त्याप्रमाणे त्यांच्या घरकुलांची कामे होण्यासाठी त्यांचा प्रभावी वापर होईल याची दक्षता घेणे. या व्यतिरिक्त प्रत्येक डेमो हाऊसमध्ये माहिती कक्ष किंवा **लाभार्थी / महिला स्वयं सहायता गट यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी महिला स्वयंसहायता गट/ ग्रामसंघ/ प्रभाग संघ/ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था/ शेतकरी उत्पादक कंपनी, इ. समुदाय आधारीत संस्थांच्या सहकार्यातून कॉप-शॉप (Co-op Shop) सुरु करणे.**

### ix.शासकीय योजनांशी कृतीसंगम (Convergence) करणे :-

सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या विविध योजनांशी कृतीसंगम करणे. जसे - ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांना रोजगार मिळवून देण्यासाठी **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना**, शौचालयासाठी **स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण**, नळाने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेसाठी **जल जीवन मिशन**, गॅस जोडणी साठी **प्रधानमंत्री उज्ज्वला योजना**, विद्युत जोडणी साठी **सौभाग्य योजना**, उपजिविकेचे साधन उपलब्ध करुन देणेसाठी **राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती मिशन**, उर्जेच्या बचतीसाठी **महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (महाउर्जा)**, इ. तसेच **दलित वस्ती सुधार योजना**, **ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना**, **जिल्हा परिषद सेस**, **पंचायत समिती सेस**, **ग्राम पंचायत सेस**, **सीएसआर निधी** इ. च्या माध्यमातून लाभार्थ्यांची घरकुले, बहुमजली इमारती,



गृहसंकुले, अपार्टमेंट यांना **मूलभूत नागरी सुविधा जसे जोडरस्ते, अंतर्गत रस्ते, ड्रेनेज सिस्टीम, पथदिवे**, इ. उपलब्ध करुन देणे.

**x.नावीन्यपूर्ण उपक्रम** (Innovations / Best Practices) **राबविणे** :- ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणीमध्ये गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी पुढीलप्रमाणे नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणे.

**१. लॅण्ड बँक** :- सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता जागा उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर विविध मार्गांनी उपलब्ध होणाऱ्या जागांची '**लॅण्ड बँक**' तयार करणे.

**२. सॅण्ड बँक** :- सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता वाळू उपलब्ध करुन देण्यासाठी प्रत्येक जिल्हा परिषद गटात किमान एक याप्रमाणे '**सॅण्ड बँक**' ची निर्मिती करणे.

**३. घरकुल मार्ट** :- राज्यात महिला स्वयंसहायता गट/ग्राम संघ/ प्रभाग संघ/ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था/ शेतकरी उत्पादक कंपनी, इ. समुदाय आधारीत संस्थाद्वारे प्रत्येक जिल्हा परिषद गटामध्ये किमान एक **घरकुल मार्ट** सुरू करून त्याद्वारे घरकुलाचे बांधकाम साहित्य जसे – दगड, विटा, वाळू, सिमेंट, दारे, खिडक्या, छताचे साहित्य, इ. विक्रीसाठी उपलब्ध करणे.

**४. गृहकर्ज** :- घरकुलांचे बांधकाम जलद गतिने पूर्ण करण्यासाठी वित्तीय संस्थांच्या समन्वयातून गरजेप्रमाणे इच्छुक लाभार्थ्यांना **गृहकर्ज** मिळवून देण्याची प्रक्रीया सुलभ करणे.

**५.वाळूला पर्याय** :- क्रश सॅण्ड, सिमेंट ब्लॉक, फ्लाय ॲश ब्रिक्स, इंटर लॉकींग ब्रिक्स, हॉलो ब्रिक्स, इत्यादींचा वापर **वाळूला पर्याय** म्हणून करणे.

**६.मॉडेल हाऊसेस** :- किमान १०% घरकुल बांधकामामध्ये फरशी/लादी, रंगरंगोटी, किचन गार्डन/परसबाग, रेन वॉटर हार्वेस्टींग, सौरउर्जा साधने व नेट बिलींग, इ.चा वापर करून **मॉडेल हाऊसेस** उभारणे. रंगरंगोटी करतांना शासनाचे पत्र क्र.जा.क्र.राव्यक-ग्रागृ/बांध/१४०/२०२१, दिनांक १८ मे, २०२१ रोजीच्या पत्रानुसार घरकुलांना रंगसंगती करणे.

**७.नववीन तंत्रज्ञान** :- किमान १०% घरकुल बांधकामासाठी स्थानिक बांधकाम साहित्य, नवनवीन बांधकाम तंत्रज्ञान,किफायतशीर बांधकाम तंत्रज्ञान, नैसर्गिक आपत्ती रोधक तंत्रज्ञान, इ. **नवनवीन तंत्रज्ञानाचा** वापर करणे.

**८.पथदर्शी प्रकल्प** :-सिडको (City and Industrial Development Corporation of Maharashtra Limited) सारख्या शहरी गृहनिर्माण करणाऱ्या संस्थांच्या मदतीने **पथदर्शी प्रकल्प** म्हणून Precast Technology घरे करण्यासाठी प्रयत्न करणे.

९.घरावर ग्रामीण गृहनिर्माण **योजनेचा लोगो, पती पत्नीचे नाव व ग्रामपंचायतीच्या मालमत्ता नोंदवही मध्ये घरकुलाची नोंद** इ. बाबींची पूर्तता करणे.

**१०.क्षेत्र अधिकारी ॲप** :- ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी प्रधानंत्री आवास योजना-ग्रामीण ची प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी **क्षेत्र अधिकारी ॲप** (Area Officer App) ची निर्मिती केली आहे. ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामाची पहाणी करतांना या ॲपचा जास्तीत जास्त वापर करणे.

## अभियानाच्या अंमलबजावणीसाठी क्षमताबांधणी कार्यक्रम

"**महा आवास अभियान २०२३-२४**" च्या प्रभावी अंमलबजावणी व भागधारकांच्या क्षमता बांधणीसाठी राज्यस्तरीय अभियान शुभारंभ कार्यशाळेसह राज्यात **विभागस्तरीय कार्यशाळा, जिल्हास्तरीय कार्यशाळा, तालुकास्तरीय कार्यशाळा व ग्रामस्तरीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात येत आहे. या कार्यशाळांमध्ये अभियाना विषयी सखोल मार्गदर्शन करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे या कार्यशाळांच्या माध्यमातून अभियान यशस्वितेसाठी उपाययोजना व नियोजन करण्यात येत आहे.**

**ग्राम कृती गटाचे** (Village Action Group) **गठन**:- या ग्रामस्तरीय कार्यशाळेमध्ये प्रत्येक ग्रामपंचायती मध्ये 'ग्राम कृती गटाचे गठन' करण्यात येत आहे. यामध्ये गावातील प्रभावी व्यक्ती, युवक/युवती, इत्यादींचा समावेश करत आहे. उदा. सरपंच, ग्रामसेवक, पोलीस पाटील, शिक्षक, पोलीस इ. प्रभावी व्यक्ती. या गटाने "**महा आवास अभियान २०२३-२४**" मध्ये गावस्तरावर केल्या जाणाऱ्या व करावयाच्या प्रत्यक्ष उपाय योजनांचा पाठपुरावा करुन अभियान १०० टक्के यशस्वी करावयाचे आहे.

**लाभार्थी मेळावे** :- गावोगावी लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत लाभार्थ्यांचे मेळावे आयोजित करुन लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम व दर्जाबाबत मार्गदर्शन, प्रोत्साहन देणे, तसेच लाभार्थ्यांना घरकुल मंजूरी पत्र वितरण करणे, घरकुलाचे भूमिपूजन कार्यक्रम आयोजित करणे, घरकुलांचे हप्ते वितरण कार्यक्रम करणे, गृहप्रवेश कार्यक्रम करणे, इ. सारखे उपक्रम राबविणेत यावेत.

**बँक मेळावे**:- तालुकास्तरावर/ गावोगावी बँक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घरासाठी कर्ज घेवू इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांसाठी बँक मेळाव्याचे आयोजन करुन लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी कर्ज उपलब्धतेसाठी प्रयत्न करण्यात यावेत.



### अभियानच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी माहिती शिक्षण व संवाद (IEC) कार्यक्रम

'महा आवास अभियान २०२३-२४' अंतर्गत राज्यात राबविण्यात येणाऱ्या विविध घरकुल योजनांबाबत जन जागृती, प्रचार-प्रसिध्दी करण्यासाठी माहिती, शिक्षण व संवाद (IEC) च्या विविध उपक्रमांचा जसे- Mass मिडीया, Outdoor मिडीया, Social मिडीया, Group मिडीया, आंतरव्यक्ती संवाद (IPC), पारंपारीक मिडीया, इ. उपक्रमांचा यथोचीत वापर करण्यात यावा.

### अभियानाची प्रभावी अंमलबजावणी, सनियंत्रण व मूल्यमापन

**'महा आवास अभियान २०२३-२४'** च्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व गाव स्तरावर समित्या कार्यरत राहतील. या सर्व स्तरावरील अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समित्या राज्यस्तर, विभागस्तर, जिल्हास्तर, तालुकास्तर व गावपातळीवरुन क्षमता बांधणी कार्यशाळा, आढावा बैठका, क्षेत्रिय भेटी (Field Visits), Awaas Soft, MIS Formats, इ. द्वारे अभियानाचे संनियंत्रन व मूल्यमापन करतील.

### अभियान कालावधीतील उत्कृष्ट कार्याचा गौरव

दिनांक २० नोव्हेंबर २०२३ ते अभियान कालावधी संपल्यावर अभियानात राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे मूल्यमापन करण्यात येईल. या मूल्यमापनाच्या आधारे राज्य, विभाग, जिल्हा, तालुका, ग्रामस्तरावर उत्कृष्ट कामासाठीच्या पुरस्कारांची नामांकने काढण्यात येतील. **'महा आवास अभियान २०२३-२४'** मध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना पुढीलप्रमाणे **'महा आवास अभियान २०२३-२४'** देऊन गौरविण्यात येईल.

| पुरस्कार नामांकने | उत्कृष्ट कामासाठीच्या पुरस्कारांची नामांकने निवडण्यासाठी समित्या |
|---|---|
| राज्यस्तरीय पुरस्कारांची निवड | राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |
| विभागस्तरीय पुरस्कारांची निवड | विभागस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |
| जिल्हास्तरीय पुरस्कारांची निवड | जिल्हास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |
| तालुकास्तरीय पुरस्कारांची निवड | तालुकास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |
| ग्रामपंचायतस्तरीय पुरस्कारांची निवड | तालुकास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |

#### अ. राज्यस्तरीय पुरस्कार

**प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण**

i.सर्वोत्कृष्ट विभाग- प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
ii.सर्वोत्कृष्ट जिल्हे - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii.सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iv.सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
v. सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत, सर्वोत्कृष्ट गृहसंकुल व सर्वोत्कृष्ट बहुमजली गृहसंकुल (हाऊसिंग अपार्टमेंट) - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

**राज्य पुरस्कृत आवास योजना**

i.सर्वोत्कृष्ट विभाग- प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
ii.सर्वोत्कृष्ट जिल्हे - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii.सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iv.सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
v. सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत, सर्वोत्कृष्ट गृहसंकुल व सर्वोत्कृष्ट बहुमजली गृहसंकुल (हाऊसिंग अपार्टमेंट) - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

#### ब. विभागस्तरीय पुरस्कार

**प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण**

i.सर्वोत्कृष्ट जिल्हे - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
ii.सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii.सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iv.शासकीय जागा उपलब्धता व वाळू उपलब्धता सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

**राज्य पुरस्कृत आवास योजना**

i.सर्वोत्कृष्ट जिल्हे - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
ii.सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii.सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iv.शासकीय जागा उपलब्धता व वाळू उपलब्धता सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

#### क. जिल्हास्तरीय पुरस्कार

**प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण**

i.सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
ii.सर्वोत्कृष्ट क्लस्टर - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii.सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

**राज्य पुरस्कृत आवास योजना**

i.सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
ii.सर्वोत्कृष्ट क्लस्टर - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii.सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

#### ड. तालुकास्तरीय पुरस्कार

**प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण**

i.सर्वोत्कृष्ट क्लस्टर – प्रथम क्रमांक.
ii.सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii.सर्वोत्कृष्ट घरकुल - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

**राज्य पुरस्कृत आवास योजना**

i.सर्वोत्कृष्ट क्लस्टर – प्रथम क्रमांक.
ii.सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii.सर्वोत्कृष्ट घरकुल - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

#### इ. ग्रामपंचायतस्तरीय पुरस्कार

**प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण**

सर्वोत्कृष्ट घरकुल - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

**राज्य पुरस्कृत आवास योजना**

सर्वोत्कृष्ट घरकुल - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.




## घरकुल बांधकामात महाराष्ट्र देशात अव्वल करणार

राज्याच्या लोकसंख्येचा मोठा भाग ग्रामीण भाग असून ग्रामीण भागातील प्रत्येक माणसाला पाणी, लाईट, गॅस व घर मिळाले पाहिजे या उद्देशाने देशाचे मा.प्रधानमंत्री श्री. नरेंद्रजी मोदी यांनी या सर्व गोष्टींना अग्रक्रम दिला आहे. महा आवास अभियानात ७ लाख घरे पूर्ण करण्याचा आमचा संकल्प असून आपल्या यंत्रणेने ठरवलं तर हे काम अभियान कालावधी संपण्याचा आत करू शकतील, असा मला पूर्ण विश्वास आहे.

इतर राज्यांच्या तुलनेत अत्यंत कमी कालावधीत घरकुल बांधकाम करून महाराष्ट्र हे देशातलं अग्रस्थानी राज्य असल्याचे मला सिध्द करायचे आहे. घरकुल बांधकाम करतांना गतीमानते सोबतच गुणवत्ता राखत दर्जेदार घरकुलांची निर्मिती करणे आवश्यक आहे. याकरीता आपल्या यंत्रणेने सातत्याने पाठपुरावा, आढावा बैठका, क्षेत्रिय भेटी व जनजागृती करणे आवश्यक असून याकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प संचालक, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वेळ देऊन सरपंच ते ग्रामसेवकापर्यंत आढावा घ्यावा.

प्रकल्प संचालक यांचे बळकटीकरण करण्यासाठी त्यांचे अधिकार आम्ही वाढवून दिले आहे. तरी आज आपण सर्वांनी हे अभियान कुठल्याही परिस्थितीमध्ये पूर्णत्वास नेण्याचा संकल्प करूया !-

**मा. ना.श्री. गिरीष महाजन, मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज**

## ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात महाराष्ट्र राज्याचे स्थान उंचावले




ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात महाराष्ट्राचे स्थान देशात उंचावले केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी तसेच या कार्यक्रमात आपल्या राज्याचा देशात प्रथम क्रमांक कसा राहील, आवास योजनामध्ये उकृष्ट कामगिरी कशी करता येईल यासाठी २० नोव्हेंबर २०२३ रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनापासून या अभियानाची सुरुवात करत आहोत.

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण मार्फत घरकुलाचे कामकाज राज्यात सुरु असून आतापर्यंत अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले आहेत. यामध्ये बहुमजली इमारती, गृह संकुले, सॅण्ड बँक, लॅण्ड बँक, घरकुलासाठी जागा देण्याचे कार्यक्रमात उत्कृष्ट काम केले आहे. यामुळे महाराष्ट्राचे स्थान देशात उंचावले आहे.

मा. प्रधानमंत्री साहेबांचे सर्वासाठी घरे २०२४ हे स्वप्न असून यामध्ये महाराष्ट्राने चांगली कामगिरी बजावली आहे. गेल्या वेळेस आम्ही अभियान राबवून पाच लाख घरे पूर्ण केली. यासाठी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यासाठी बक्षीस वितरण आज होणार आहे. सर्व पुरस्कार विजेत्यांचे मी अभिनंदन करतो, यापुढेही आपण या प्रकारे कामगिरी बजावली व महाराष्ट्राचे नाव या कार्यक्रमात देशामध्ये नेहमी उच्च स्थानावर ठेवणार, याची मला खात्री आहे.

ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात अनेक उपक्रम राबविले यामध्ये आयआयटी मुंबई यांच्या माध्यमातून ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांना प्रशिक्षण, ग्रामीण गवंडी प्रशिक्षणातून गवंड्याच्या पॅनेलची निर्मिती, सी. एस. आर. व नवीन तंत्रज्ञान वापरून आदर्श व दर्जेदार घरांची निर्मिती, कॉप-शॉप व घरकुल मार्ट मधून रोजगार निर्मिती, आपण याद्वारे संख्यात्मक लक्ष न ठेवता घर बांधताना गुणात्मकतेची काळजी घेतली आहे. लाभार्थ्यांना घरकुलासह कृती संगमाच्या माध्यमातून इतर शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी आम्ही बारकाईने लक्ष दिले.

या अभियानात सुद्धा अशाच प्रकारे चांगले काम करू व नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून दर्जेदार घरे आपल्या लाभार्थ्यांना मिळतील अशी मला खात्री आहे. महा आवास अभियानात नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून गतीमानतेने व गुणवत्तापूर्ण घराची निर्मिती करून संपूर्ण देशात नवीन आदर्श निर्माण करू, असा मला पूर्ण विश्वास आहे. या अभियानाच्या यशस्वीतेसाठी माझ्याकडून सर्व शासकीय यंत्रणेला शुभेच्छा!

**श्री. एकनाथ डवले, प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग**

## महा आवास अभियान २०२३-२४ राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळा

"सर्वांसाठी घरे-२०२४" या शासनाच्या धोरणा अंतर्गत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे व गुणवत्ता आणणे या हेतूने महाराष्ट्र राज्यात **दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ ते दिनांक ३१ मार्च २०२४ या कालावधीत "महा आवास अभियान २०२३-२४"** राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री. गिरीष महाजन यांच्या शुभहस्ते व मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले, मा. सचिव, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना श्री. के. टी. पाटील व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक २३ नोव्हेंबर, २०२३ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे संपन्न झाला.

या राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळेला सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), ग्राम विकास व पंचायत राज विभागातील अधिकारी/कर्मचारी, राज्य व्यवस्थापन कक्षातील उपसंचालक श्री.नीलेश काळे, उपसंचालक श्रीमती राजलक्ष्मी येरपुडे यांच्यासह सर्व अधिकारी/कर्मचारी, बँक प्रतिनिधी, मिडीया प्रतिनिधी व महा आवास अभियान २०२१-२२ पुरस्कार विजेते उपस्थित होते.

या कार्यशाळेच्या सुरुवातीला मान्यवरांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन व स्वागत समारंभ करण्यात आला. या कार्यशाळेचे प्रास्ताविक मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले यांनी सादर केले. त्यानंतर संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे **"महा आवास अभियान २०२३-२४"** सादरीकरण केले.

मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.गिरीष महाजन यांनी सर्व उपस्थितांना ग्राम विकास व पंचायत राज विभागा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना तसेच या सर्व योजनांमध्ये ग्रामीण गृहनिर्माण योजनांचे महत्व या विषयी अत्यंत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. **"महा आवास अभियान २०२३-२४"** या अभियानांच्या माध्यमातून ७ लाख घरकुले पूर्ण करणार असून या अभियानाच्या यशस्वीतेकरीता सर्वांनी सक्रीय सहभाग घेण्याचे आवाहन मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.गिरीष महाजन यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन उप संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण श्री.नीलेश काळे यांनी केले. राष्ट्रगीताने या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.






## महा आवास अभियान २०२३-२४ विभागस्तरीय क्षमता बांधणी कार्यशाळा

राज्यातील सर्व विभागांमध्ये **दिनांक २१ नोव्हेंबर, २०२३ ते २७ नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत** संबंधित विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी ( जिल्हा परिषद), अतिरिक्त आयुक्त/ उपायुक्त (आदिवासी विकास, सामाजिक न्याय, कामगार) यांचे उपस्थितीत विभागस्तरीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळांना प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प), सहाय्यक आयुक्त (समाज कल्याण), उप जिल्हा कार्यकारी अधिकारी (महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ), जिल्हा माहिती अधिकारी, गट विकास अधिकारी, विभागीय कार्यालयातील संबंधित अधिकारी/ कर्मचारी, बँक प्रतिनिधी, मिडीया प्रतिनिधी, इ. यांना अभियानाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

विभागस्तरीय कार्यशाळेचे आयोजन व अभियानाचे सादरीकरण उपायुक्त (विकास) यांनी केले. या कार्यशाळेला राज्यस्तरावरुन राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे अधिकारी निरीक्षक म्हणून उपस्थित होते.



## महा आवास अभियान २०२३-२४ जिल्हास्तरीय क्षमता बांधणी कार्यशाळा

राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये **दिनांक २८ नोव्हेंबर, २०२३ ते ०४ डिसेंबर, २०२३ या कालावधीत** मा.पालकमंत्री यांचे अध्यक्षतेखाली तसेच मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद यांचे प्रमुख उपस्थितीत आणि मा. खासदार, मा. आमदार, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प), सहाय्यक आयुक्त (समाज कल्याण), उप जिल्हा कार्यकारी अधिकारी (महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ) यांच्या उपस्थितीत जिल्हास्तरीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळांना जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती सभापती, उपसभापती, गट विकास अधिकारी, तहसिलदार, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी, तालुकास्तरीय डाटा एन्ट्री ऑपरेटर, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, बँक प्रतिनिधी, मिडीया प्रतिनिधी, इ. यांना अभियानाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यशाळांचे आयोजन व अभियानाचे सादरीकरण प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) यांनी केले. या कार्यशाळेस विभागस्तरावरील अधिकारी हे निरीक्षक म्हणून उपस्थित होते.



## महा आवास अभियान २०२३-२४ तालुकास्तरीय क्षमता बांधणी कार्यशाळा

राज्यातील जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये **दिनांक ०५ डिसेंबर, २०२३ ते ११ डिसेंबर, २०२३** या कालावधीत तालुक्याचे मा. आमदार यांचे अध्यक्षतेखाली तसेच पंचायत समिती सभापती, उपसभापती, जिल्हा परीषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, गट विकास अधिकारी, तहसिलदार यांच्या उपस्थितीत तालुकास्तरीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळांना तालुक्यातील सर्व सरपंच, ग्रामसेवक, तलाठी, पंचायत समिती कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, बँक प्रतिनिधी, मिडीया प्रतिनिधी, इत्यादींना अभियानाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यशांळेचे आयोजन व अभियानाचे सादरीकरण पंचयात समितीचे गट विकास अधिकारी यांनी केले. सदर कार्यशाळेस जिल्हास्तरावरील संपर्क अधिकारी हे निरीक्षक म्हणून उपस्थित होते.



## महा आवास अभियान २०२३-२४ ग्रामस्तरीय क्षमता बांधणी कार्यशाळा

राज्यात सर्वत्र **दिनांक १२ डिसेंबर, २०२३ ते १८ डिसेंबर, २०२३ या कालावधीत** गावस्तरावर सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत सदस्य व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत **ग्रामस्तरीय कार्यशाळा** आयोजित करण्यात आले. या कार्यशाळांमध्ये ग्रामसेवक, तलाठी यांनी अभियानाबाबत सखोल मार्गदर्शन केले.

या कार्यशाळांद्वारे **"महा आवास अभियान २०२३-२४"** चे यशस्वी अंमलबजावणीसाठी मिळालेली माहिती सर्व लाभार्थी यांना देवून गावातील गतिमान अंमलबजावणीबाबतचे नियोजन करण्यात आले. या कार्यशाळेस तालुकास्तरावरील संपर्क अधिकारी हे निरीक्षक म्हणून उपस्थित होते.

या ग्रामस्तरीय कार्यशाळेमध्ये प्रत्येक ग्रामपंचायती मध्ये 'ग्राम कृती गटाचे गठन' करण्यात आले. लाभार्थ्यांना मार्गदर्शनासाठी गावोगावी लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत लाभार्थ्यांचे मेळावे आयोजित करण्यात आले. तालुकास्तरावर/गावोगावी बँक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घरासाठी कर्ज घेवू इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांसाठी बँक मेळाव्याचे आयोजन करुन लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी कर्ज उपलब्धतेसाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.



## मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज तथा पालकमंत्री, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे येथे जिल्हास्तरीय महा आवास अभियान २०२३-२४ कार्यशाळा संपन्न

दिनांक २७ डिसेंबर, २०२३ रोजी धुळे येथे मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज तथा पालकमंत्री, धुळे जिल्हा श्री.गिरीष महाजन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय महा आवास अभियान २०२३-२४ कार्यशाळा संपन्न झाली. याप्रसंगी मा. मंत्री महोदयांच्या शुभहस्ते अमृत महा आवास अभियान २०२२-२३ पुरस्कार वितरण व मोदी आवास घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना घरकुल मंजूरी पत्र वितरीत करण्यात आले.

या कार्यशाळेला धुळे जिल्ह्याचे मा.खासदार डॉ.सुभाष भामरे, मा.आमदार श्री.जयकुमार रावल, जिल्हाधिकारी श्री.अभिनव गोयल, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.शुभम गुप्ता, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक श्री. बाळासाहेब बोटे,सहाय्यक प्रकल्प अधिकारी श्रीमती भावना पाटील, जिल्हा परिषदचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री.मोरे व जिल्ह्यांतर्गत सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थितांना महा आवास अभियान २०२३-२४ विषयी मार्गदर्शन व अभियानाच्या यशस्वीतेसाठीचे नियोजन करण्यात आले. तसेच मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री. गिरीष महाजन यांच्या शुभहस्ते अमृत महा आवास अभियान २०२२-२३ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पंचायत समिती, ग्राम पंचायत आणि क्लस्टर यांना जिल्हास्तरीय अमृत महा आवास अभियान पुरस्कार देवून गौरविण्यात आले. त्याचप्रमाणे धुळे जिल्ह्यात मोदी आवास घरकुल योना अंतर्गत घरकुल मंजुर लाभार्थ्यांना मंजुरी पत्र देऊन या योजनेची सुरुवात मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज तथा पालकमंत्री, धुळे जिल्हा श्री.गिरीष महाजन यांच्या शुभहस्ते करण्यात आली.



## पालघर जिल्ह्यात पालकमंत्री यांच्या शुभहस्ते घरकुल लाभार्थ्यांचा गौरव

दिनांक १५ नोव्हेंबर, २०२३ रोजी मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम, अन्न आणि नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण तथा पालकमंत्री, पालघर जिल्हा श्री.रवींद्र चव्हाण यांच्या शुभहस्ते पालघर तालुक्यातील धनसार ग्रामपंचायत मधून विकसित भारत संकल्प यात्रेचा शुभारंभ झाला.

या कार्यक्रमाकरीता पालघर जिल्हा परिषदचे मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व अन्य पदाधिकारी अधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रम अंतर्गत विविध योजनांचे लाभ मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

यावेळी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुले पूर्ण करणाऱ्या लाभार्थ्यांना मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम, अन्न आणि नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण तथा पालकमंत्री, पालघर जिल्हा श्री.रवींद्र चव्हाण यांच्या शुभहस्ते प्रातिनिधीक स्वरूपात घरकुलाची चावी देवून गौरविण्यात आले. यामुळे लाभार्थ्यांमध्ये नवचैतण्य निर्माण झाले.



## मा.आमदार, प्रताप अडसड यांनी केली घरकुल लाभार्थ्यांची क्षमता बांधणी

अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वरचे तालुक्याचे मा.आमदार श्री.प्रताप अडसड यांच्या शुभहस्ते दिनांक ०६ ऑक्टोंबर, २०२३ रोजी भूमिहीन घरकुल लाभार्थ्यांना जागा वाटप व तालुकास्तरीय अमृत महा आवास अभियान पुरस्कार वितरण करण्यात आले. तसेच दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२३ रोजी मा. आमदार महोदयांच्या अध्यक्षतेखाली सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत घरकुले पूर्ण करण्यासाठी सरपंच व ग्रामसेवक यांची बैठक घेण्यात आली.

यावेळी मा.आमदार श्री.प्रताप अडसड यांनी लाभार्थ्यांना घरकुलाचे महत्व पटवून सांगितले. तसेच घरकुल योजनाचे मार्गदर्शन करत लाभार्थ्यांची क्षमता बांधणी केली.



## गडचिरोलीत मा.खासदार यांच्या शुभहस्ते घरकुल लाभार्थी सन्मानीत

दिनांक १५ नोव्हेंबर, २०२३ रोजी गडचिरोली चिमूर लोकसभा क्षेत्राचे मा.खासदार श्री.अशोकजी नेते यांच्या शुभहस्ते व आरमोरी विधानसभा क्षेत्राचे मा.आमदार श्री.कृष्णाजी गजभे यांच्या प्रमुख उपस्थितीत गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तालुक्यांतर्गत वैरागड ग्रामपंचायतमध्ये विकसित भारत संकल्प यात्रा शुभारंभ कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमाकरीता गडचिरोली जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, अधिकारी ,कर्मचारी व लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत लाभार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानीत करण्यात आले.



## मा. आमदार श्री. अनिल बाबर यांच्या अध्यक्षतेखाली घरकुल लाभार्थी मेळावे संपन्न

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सांगली अंतर्गत आज पंचायत समिती कडेगाव मिरज,आटपाडी व खानापूर या तीन तालुक्यांमध्ये मा.आमदार श्री.अनिल बाबर यांच्या अध्यक्षतेखाली घरकुल लाभार्थी मेळावा व तालुकास्तरीय अमृत महा आवास अभियान पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या घरकुल लाभार्थी मेळावा व पुरस्कार वितरण समारंभास सबंधित तालुक्यातील पंचायत समितीचे पदाधिकारी, गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, सरपंच, ग्रामसेवक, लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिनांक १२ ऑक्टोबर, २०२३ रोजी खानापूर पंचायत समिती, विटा व पंचायत समिती, आटपाडी येथे घरकुल लाभार्थी मेळावा व अमृत महा आवास अभियान तालुकास्तरीय पुरस्काराचे वितरण मा.आमदार श्री.अनिल बाबर यांच्या शुभहस्ते करण्यात आले . याप्रसंगी खानापूर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी डॉ.पाटील, प्रांत श्री.गायकवाड उपस्थित होते. पंचायत समिती, आटपाडीचे गट विकास अधिकारी श्री. मुक्तेश्वर माडगूळकर, सहाय्यक गट विकास अधिकारी श्री.सचिन भोसले, तहसीलदार श्रीमती माने यांच्यासह सर्व खाते प्रमुख व संबंधित कर्मचारी उपस्थित होते.



## ग्रामीण गवंडी प्रशिक्षणांच्या माध्यमातून कुशल गवंडी व प्रलंबित घरकुलांची निर्मिती

राज्यात महा आवास अभियान २०२३-२४ मध्ये घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या प्रशिक्षणांचे उद्दिष्ट प्रशिक्षण देणाऱ्या संस्था (Training Provider) यांच्याशी समन्वय ठेवून पूर्ण करुन **त्यांचे मुल्यांकन**(Assessment) **त्वरीत पूर्ण करुन घेतले जात आहे. तसेच** सदर माहिती आवास सॉफ्टवर अद्ययावत होत आहे.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत प्रलंबित घरकुले (Deleayed Houses) प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी ग्रामीण गवंडी प्रशिक्षणाचा उपयोग करून घरकुले पूर्ण करण्यात येत आहे. तसेच प्रशिक्षित ग्रामीण गवंडी व ग्रामपंचायत क्षेत्रातील इतर उपलब्ध गवंडी यांची ग्रामपंचायतनिहाय यादी तयार करुन त्यांचे पॅनेल बनविणे व या **पॅनेलमधील गवंड्यांचा ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील घरकुलांच्या बांधकामात सहभाग घेणे**, इ. बाबतचे काम प्रगती पथावर आहे. यामुळे अभियान कालावधीत प्रलंबित घरकुले पूर्ण होण्याच्या कामास गती मिळाली असून मोठ्या प्रमाणात कुशल गवंडी व रोजगार निर्मिती होत आहे. ग्रामीण गवंडी प्रशिक्षणांमुळे गुणवत्तापूर्ण घरकुलांची निर्मिती होत आहे.






# सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचाय राज विभाग यांच्या आढावा बैठका

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले यांच्या अध्यक्षतेखाली व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे यांच्या उपस्थितीत माहे ऑक्टोबर ते डिसेंबर, २०२३ या कालावधीत आढावा बैठका संपन्न झाल्या.

या बैठकांना सर्व विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त (विकास), मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद),प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) व गट विकास अधिकारी (पंचायत समिती) दूरदृष्य प्रणालीव्दारे उपस्थित होते.

संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे यांनी गृहनिर्माण योजनांच्या प्रगतीबाबत सादरीकरण केले. त्यानुसार मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले यांनी सूचना केल्या. यामध्ये सर्व अपूर्ण घरे दिनांक ३१ डिसेंबर,२०२३ पर्यंत पूर्ण करण्यासाठी सध्याच्या कामापेक्षा तीन पटीने जास्त काम करणे, त्या दृष्टीने सर्व स्तरावर नियमित आढावा बैठका घेणे, सर्व घरकुलांना तात्काळ मंजूरी देणे, शबरी आवास योजने अंतर्गत घरकुलांना मंजूरीबाबत आदिवासी विकास विभागाचा दिनांक १७ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करणे, **मोदी आवास घरकुल** योजनेंतर्गत या आर्थिक वर्षात ३ लाख घरकुलाचे उद्दिष्ट वितरीत करणे व घरकुलांना मंजूरी देणे, **प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत प्रलंबित घरकुले** (Delayed Houses) **पूर्ण करणे**, भूमिहिन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे, **प्रलंबित हप्ते वितरीत करणे व** अटल बांधकाम कामगार आवास योजनेतील लाभार्थ्यांना तात्काळ मंजूरी देणे असे सूचित केले.




# मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्याकडून घरकुलांची तपासणी

दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२३ रोजी मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले यांनी पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्याला भेट दिली. या भेटी दरम्यान त्यांनी विविध विकास कामांची पाहणी केली. यावेळी केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत आवास योजना अंतर्गत घरकुलांची तपासणी व लाभार्थ्यांशी चर्चा केली.

या दौरा कार्यक्रमा दरम्यान मा.प्रधान सचिवांनी घरकुल बांधकामाचा दर्जा व घरकुल लाभार्थ्यांना मिळत असलेल्या नागरी सुविधांची तपासणी केली. तसेच घरकुल लाभार्थ्यांना घरकुलासह मिळत असलेल्या इतर शासकीय योजनांविषयी मार्गदर्शन केले.

याप्रसंगी पालघर जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.भानुदास पालवे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रवींद्र शिंदे, पंचायत समिती डहाणू गट विकास अधिकारी श्रीमती पल्लवी सस्ते व इतर अधिकारी, कर्मचारी, ग्रामस्थ उपस्थित होते.



# घरकुल उद्दिष्टपूर्तीसाठी ग्रामीण विकास मंत्रालय भारत सरकारच्या बैठका

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत अपूर्ण घरकुले पूर्ण करणेसाठी ग्रामीण विकास मंत्रालय भारत सरकार यांचेकडून आढावा बैठका घेण्यात आल्या. या बैठकांना महाराष्ट्र राज्याच्या वतीने संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे उपस्थित होते.

"सर्वांसाठी घरे २०२४ या धोरणांतर्गत राज्यातील सर्व बेघर व कच्च्या घरात वास्तव्य करणाऱ्या पात्र कुटुंबांना मुलभूत सुविधायुक्त पक्के घरकुल उपलब्ध करुन देण्यासाठी राज्यात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण राबविण्यात येत आहे. राज्यात या योजने अंतर्गत मंजूर घरकुलांना पहिला हप्ता, दुसरा हप्ता व तिसरा हप्ता वितरीत करणे प्रलंबित आहे. राज्याकडे निधी उपलब्ध असूनही हप्ते वितरीत होत नाही. तसेच पहिला हप्ता वितरीत केल्यापासून १२ व १८ महिन्यांपेक्षा जास्त कालावधी सर्व प्रलंबित घरकुले प्राधान्याने पूर्ण करण्याबाबत मा. उप महानिदेशक, ग्रामीण विकास मंत्रालय,

भारत सरकार श्री. गया प्रसाद यांनी सूचित केले.

राज्य शासनाने वार्षिक कृती आराखडा सन २०२२-२३ मध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत सर्व अपूर्ण घरकुले दिनांक ३१ डिसेंबर, २०२३ पर्यंत पूर्ण करणेबाबत वचनबध्दता दिली आहे. परंतु सद्यस्थितीत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत घरकुल बांधकामाची सध्याची गती ९३४ घरे प्रतिदिन अशी आहे. महाराष्ट्र राज्यात प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत घरे पूर्ण होण्यासाठी सरासरी ३९५ दिवस लागतात आणि त्यामुळे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी घरांच्या बांधकामाला गती देण्याची गरज असल्याचे मा. उप महानिदेशक, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार श्री.गया प्रसाद यांनी स्पष्ट केले.

राज्य शासनाने दिलेल्या वचनबध्दता नुसार प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत सर्व अपूर्ण घरकुले दिनांक ३१ डिसेंबर, २०२३ पर्यंत पूर्ण करण्यासाठी योग्य ते नियोजन करुन, आपले अधिनस्त प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, गट विकास अधिकारी, पंचायत समिती व ग्रामसेवक यांना उद्दिष्ट देवून तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना यावेळी मा. उप महानिदेशक, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार श्री. गया प्रसाद यांनी दिल्या.

महाराष्ट्र राज्यात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत सर्व घरकुले पूर्ण करण्यासाठी राज्यात आढावा बैठका, क्षेत्रीय भेटी व महा आवास अभियान २०२३-२४ ची प्रभावी अंमलबजावणी सुरू असल्याचे संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे यांनी सांगितले.




## केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुले जलद गतीने पूर्णतेसाठी ग्रामीण विकास मंत्रालय भारत सरकारच्या अधिकाऱ्यांचा महाराष्ट्र दौरा

राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुल बांधकामात गतीमानता आणण्यासाठी व या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्याकरीता ग्रामीण विकास मंत्रालय भारत सरकारच्या अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र राज्याचा दौरा केला.

यामध्ये दिनांक १० व ११ ऑक्टोबर, २०२३ या कालावधीत सह संचालक, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार श्री.आशिष शिंदे यांनी महाराष्ट्र राज्याचा दौरा केला. या दौऱ्या दरम्यान त्यांच्या समवेत राज्य व्यवस्थापन कक्षाचे वास्तुविशारद श्री.परमेश्वर शेलार उपस्थित होते.

दिनांक १० ऑक्टोबर, २०२३ रोजी श्री.आशिष शिंदे यांनी ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यांतर्गत ग्रामपंचायत वडपे, मोंधुळे व डोहोळे येथे क्षेत्रीय भेट देवून घरकुलांची पहाणी केली व ग्रामस्थांशी संवाद साधला. तसेच त्यांनी पंचायत समिती भिवंडी येथे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण विषयक आढावा बैठक घेवून डेमो हाऊसची पहाणी केली. तसेच दिनांक ११ ऑक्टोबर, २०२३ रोजी राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयास भेट देवून प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या प्रगतीबाबत चर्चा केली. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे डॉ.राजाराम दिघे यांच्या प्रमुख उपस्थितीत राज्यातील सर्व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक यांची व्हिडिओ कॉन्फरन्स व्दारे बैठक घेतली.

त्याचप्रमाणे दिनांक २७ डिसेंबर, २०२३ रोजी प्रधानमंत्री जनमन सर्वेची पाहणी करण्यासाठी ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकाचे श्री.अमीर अब्बास यांनी महाराष्ट्र राज्याचा दौरा केला. या दौऱ्या दरम्यान त्यांच्या समवेत राज्य व्यवस्थापन कक्षाचे राज्य समन्वयक, माहिती व तंत्रज्ञान श्री.राम आघाव उपस्थित होते.

या दौरा कार्यक्रमात श्री.अमीर अब्बास यांनी पनवेल तालुक्यातील वाकडी व खानाव ग्रामपंचायतींना भेट देऊन प्रधानमंत्री जनमन सर्वेच्या कामाची पाहणी व आवश्यक मार्गदर्शन केले. यावेळी पंचायत समिती पनवेलचे विस्तार अधिकारी श्री.यु.डी.पाटील, सबंधित ग्रामपंचायतींचे ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता श्री.जाधव व डेटा एन्ट्री ऑपरेटर उपस्थित होते.





## सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत अपूर्ण घरकुले पूर्ण करण्यासाठी मोहिम

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांतर्गत अपूर्ण घरकुले जलद गतीने पूर्ण करण्यासाठी दिनांक ०६ नोव्हेंबर, २०२३ ते दिनांक १० नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत राज्यस्तरीय संपर्क अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली मोहिम राबविण्यात आली.

या मोहिमेकरीता राज्यस्तरावरून चंद्रपुर येथे नागपूर व अमरावती विभागाकरीता संपर्क अधिकारी म्हणून उपसंचालक श्रीमती.राजलक्ष्मी येरपुडे व राज्य समन्वयक (M&E) डॉ.संघरत्न सोनवणे, धाराशिव येथे छत्रपती संभाजी नगर विभागाकरीता संपर्क अधिकारी म्हणून राज्य समन्वयक (IT) श्री.राम आघाव, जळगाव येथे नाशिक विभागाकरीता संपर्क अधिकारी म्हणून राज्य समन्वयक (MIS)श्री.मायकल एल्डन व पुणे येथे पुणे व कोंकण विभागाकरीता संपर्क अधिकारी म्हणून राज्य समन्वयक (MIS) श्री.संघपाल चव्हाण उपस्थित होते. जिल्हा प्रोग्रॅमर यांना त्यांच्या विभागा अंतर्गत नेमून दिलेल्या जिल्ह्याच्या ठिकाणी उपस्थित होते.

या मोहिमे अंतर्गत जी घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण आहेत, परंतु त्यांचे फोटो घेतले नाहीत, ते फोटो आवास सॉफ्ट प्रणालीवर अपलोड केलेले नाहीत व तालुकास्तरावरुन approve केलेले नाहीत, अशी घरकुले online पूर्ण करुन घेण्यात आली. Plinth व Lintel Level वरील घरकुलांना दुसरा व तिसरा हप्ता वितरीत करून घरकुल Physically पूर्ण करण्यात आली. Delayed Houses मधील घरकुले पूर्ण करण्यात आली. आधार सिडींग व आधार Authentication पूर्ण करण्यात आले.

या मोहिमेदरम्यान ग्रामविकास अधिकारी/ ग्रामसेवक, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, तालुकास्तरीय डेटा एन्ट्री ऑपरेटर व तालुकास्तरीय नोडल अधिकारी हे त्यांना नेमून दिलेल्या आपल्या कार्यक्षेत्रात उपस्थित होते. जिल्हास्तरावर या मोहिमेचे संनियंत्रण व मूल्यमापन जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक यांचेमार्फत आढावा बैठका व क्षेत्रीय भेटींच्या माध्यमातून करण्यात आले.





## सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय बैठक

दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२३ रोजी उपसंचालक श्रीमती राजलक्ष्मी येरपुडे व सहाय्यक संचालक (लेखा) श्रीमती पाटणे यांनी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांची बैठक घेतली.

या बैठकीमध्ये महा आवास अभियान २०२३-२४ राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळा, महा आवास अभियान २०२१-२२ पुरस्कार वितरण, भूमिहीन लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता, प्रलंबित हप्ते वितरण, प्रलंबित संदर्भ, लेखा विषयक विषयांवर सविस्तर आढावा घेण्यात आला.



## नांदेड जिल्ह्यात मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून आवास योजनांच्या आढावा बैठका

नांदेड जिल्ह्यात सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी जिल्हा परिषदच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मीनल करणवाल यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हास्तरीय सर्व खाते प्रमुखांच्या उपस्थितीत आढावा बैठका घेण्यात आल्या.

यामध्ये दिनांक ०४ ऑक्टोबर, २०२३ रोजी नांदेड जिल्ह्यातील पंचायत समिती नायगाव येथे व दिनांक १९ ऑक्टोबर, २०२३ रोजी पंचायत समिती किनवट येथे आढावा बैठक घेतली. या बैठकांना संबंधित पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंते, डेटा एन्ट्री ऑपरेटर व संबंधित तालुक्यातील ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक उपस्थित होते.

या बैठकीमध्ये श्रीमती मिनल करणवाल यांनी विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत अपूर्ण घरकुले पूर्ण करणे, घरकुलांना मंजुरी देणे व घरकुलाना बांधकामाच्या प्रगतीनुसार सर्व हप्ते तात्काळ वितरित करण्याचे सुचित केले.

त्याचप्रमाणे दिनांक २९ डिसेंबर, २०२३ रोजी जिल्हा परिषदचे अति.मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.संदीप माळोदे यांनी पंचायत समिती हिमायतनगर येथे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व मोदी आवास घरकुल योजना व रमाई आवास योजना, इ. घरकुल योजनांचा आढावा घेतला.

तसेच दिनांक २६ ऑक्टोबर, २०२३ रोजी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले यांनी जिल्हास्तरावर सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा आढावा घेतला. या बैठकीला कनिष्ठ सहाय्यक श्री.बी.व्ही. पेदेवाड, जिल्हा प्रोग्रामर श्री.गोविंद कांदे, जिल्हा ऑपरेटर श्री.मंगेश उखळे, श्री.अनिल कागदेवाड, सर्व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता व डेटा एन्ट्री ऑपरेटर उपस्थित होते.




## सांगलीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा घरकुल तपासणीसाठी क्षेत्रीय दौरा

दिनांक ०६ ऑक्टोबर, २०२३ रोजी सांगली जिल्ह्यातील पंचायत समिती शिराळा येथे जिल्हा परिषदच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती तृप्ती घोडमिसे यांच्या अध्यक्षेतेखाली व उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.शशिकांत शिंदे यांच्या उपस्थितीत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांची आढावा बैठक घेण्यात आली.

या बैठकीमध्ये सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत अपूर्ण घरकुले पूर्ण करणे, प्रलंबित घरकुले पूर्ण करणे, घरकुले रिफंड व रिमांड करणे, मोदी आवास घरकुल योजने अंतर्गत लाभार्थी निश्चित करणे, बांधकाम प्रगतीत असलेली सर्व अपूर्ण घरकुले दिनांक ३० नोव्हेंबर, २०२३ पूर्वी पूर्ण करणे, बांधकाम सुरु नसलेली घरकुले रद्द करुन रिफंड व रिमांड करणे व लाभार्थ्यांकडून आवश्यक रक्कमेची वसुली करणे अशा सूचना श्रीमती तृप्ती घोडमिसे यांनी पंचायत समिती शिराळाचे गट विकास अधिकारी श्री.संतोष राऊत यांना दिल्या.

श्रीमती तृप्ती घोडमिसे यांनी पंचायत समिती आवारातील डेमो हाऊस तसेच ग्रामपंचायत मांगले व कांदे येथे क्षेत्रीय भेट देवून पूर्ण झालेल्या घरकुलांची पहाणी केली. यावेळी पंचायत समिती शिराळा अंतर्गत सर्व विस्तार अधिकारी, संपर्क अधिकारी, सर्व ग्रामसेवक, ग्रामीण गृहनिर्माण अभियंते व डेटा एन्ट्री ऑपरेटर उपस्थित होते.

राज्यात राबविण्यात येत असलेल्या महा आवास अभियान २०२३-२४ च्या यशस्वीतेसाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती तृप्ती धोडमीसे यांच्या संकल्पनेतून व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री.निखिल ओसवाल यांच्या मार्गदर्शनाखाली पंचायत समिती पलूस अंतर्गत घरकुल लाभार्थींचा गृहप्रवेश कार्यक्रम आवास दिनाचे औचित्य साधून दिनांक २१ नोव्हेंबर, २०२३ रोजी राबविण्यात आला. याकरीता पंचायत समिती पलूसचे गट विकास अधिकारी श्री. अरविंद माने, विस्तार अधिकारी, संबंधीत ग्रामपंचायतचे सरपंच, ग्रामसेवक व लाभार्थी उपस्थित होते.




## नंदुरबार जिल्ह्यात सर्वांना घरकुलांचा लाभ देण्यासाठी प्रकल्प संचालकांचा पुढाकार

नंदुरबार आदिवासी जिल्हा असून या जिल्ह्यातील सर्व पात्र लाभार्थ्यांना घरकुल देण्यासाठी नंदुरबार जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री.राहुल गावडे यांनी पुढाकार घेतला आहे. याकरीता त्यांनी जिल्ह्यात आढावा बैठका व क्षेत्रीय भेटीचे सत्र सुरू केले आहे. श्री.राहुल गावडे यांनी दिनांक ३० ऑक्टोबर, २०२३ रोजी पंचायत समिती नंदुरबार येथे व दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२३ रोजी अक्राणी येथे विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा आढावा घेतला.

या बैठकांना पंचायत समिती नंदुरबारचे गट विकास अधिकारी श्री.जयवंत उगले, पंचायत समिती अक्राणीचे गट विकास अधिकारी श्री.सी.टी.गोस्वामी, जिल्हा प्रोग्रामर, जिल्हा ऑपरेटर, संबंधित पंचायत समितीचे विस्तार अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, तालुका डेटा एन्ट्री ऑपरेटर व संबंधित सर्व ग्रामसेवक उपस्थित होते.

या बैठकांमध्ये अपूर्ण घरकुले १५ डिसेबरपर्यंत पुर्ण करणे, प्रलंबित हप्ते वितरित करणे, प्रलंबित घरकुले पूर्ण करणे, मोदी आवास योजना प्रस्ताव तयार करणे व इतर प्रलंबित संदर्भात आढावा घेतला.



## मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज यांच्या शुभहस्ते राज्यस्तरीय महा आवास अभियान २०२१-२२ पुरस्कार वितरण

दिनांक २३ नोव्हेंबर, २०२३ रोजी महा आवास अभियान २०२१-२२ अंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणारे व्यक्ती किंवा संस्था यांना महाराष्ट्र राज्याचे मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री. गिरीष महाजन यांच्या शुभहस्ते व मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. एकनाथ डवले व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे यांच्या प्रमुख उपस्थितीत राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार देवून गौरविण्यात आले.

या कार्यक्रमात महा आवास अभियान २०२१-२२ मध्ये केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व आवास योजना अंतर्गत उत्कृष्ट कामगिरीसाठी सर्वोत्कृष्ट विभाग, सर्वोत्कृष्ट जिल्हे, सर्वात्कृष्ट तालुके, सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायती, सर्वोत्कृष्ट घरकुल, सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारती, सर्वोत्कृष्ट गृह संकुले व विविध उपक्रमांमध्ये विशेष कामगिरीसाठी सर्वोत्तम जिल्हे यांना प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक या प्रमाणे पुरस्कार वितरण करण्यात आले. त्याचप्रमाणे वैयक्तिक स्तरावर सर्वोत्तम कामगिरीसाठी राज्यस्तरीय,जिल्हास्तरीय तालुकास्तरीय अधिकारी व कर्मचारी यांना विशेष पुरस्कार देवून गौरविण्यात आले. राज्यस्तरीय पुरस्कार विजेत्यांचा गौरव प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून करण्यात आला.

याप्रसंगी राज्यातील सर्व विभागी आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, पंचायत समितीचे सभापती, पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, पुरस्कार विजेत्या ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक, सहकारी संस्थेचे प्रतिनिधी, बँक प्रतिनिधी, पत्रकार, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण व ग्राम विकास व पंचायत राज विभागाचे राज्यस्तरीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



## महा आवास अभियान २०२३-२४ राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळेत विविध माहिती, शिक्षण व संवाद साहित्यांचे प्रकाशन

दिनांक २३ नोव्हेंबर, २०२३ रोजी 'महा आवास अभियान २०२३-२४' या अभियानाची राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळा संपन्न झाली. याप्रसंगी अभियानाच्या प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने प्रकाशित केलेल्या माहिती, शिक्षण व संवाद साहित्याचे प्रकाशन मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.गिरीष महाजन यांच्या शुभहस्ते व मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.एकनाथ डवले व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे यांचे प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

यामध्ये महा आवास अभियान २०२३-२४ बाबत भागधारक, लाभार्थी व लोक यांना मार्गदर्शक ठरणारी अभियान पुस्तिक, अभियानाच्या प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी अभियान पोस्टर व महा आवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कर विजेत्यांची यशकथा सांगणारे गौरवगाथा पुस्तक, इ. चे प्रकाशन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले.

'महा आवास अभियान २०२३-२४' ची प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृती विभागस्तर, जिल्हास्तर, तालुकास्तर व ग्रामस्तरावर प्रभावीपणे व्हावी, याकरीता राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने तयार केलेले होर्डिंग, बॅनर व पोस्टर, इ. माहिती, शिक्षण व संवाद साहित्य सर्व स्तरांवर ईमेलव्दारे पाठवून प्रिटींग करून कार्यालयाच्या दर्शनीय ठिकाणी लावण्याच्या सूचना राज्यस्तरावरून सर्व अंमलबजावणी यंत्रणांना देण्यात आल्या.

या कार्यशाळेकरीता राज्यातील सर्व स्तरावरील अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी, लाभार्थी व लोक उपस्थित होते. या सर्वांना ग्रामीण गृहनिर्माण योजनांबाबत माहिती व्हावी, याकरीता राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने राज्यात राबविण्यात येत असलेल्या विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना, नावीन्यपूर्ण उपक्रम व महा आवास अभियान २०२३-२४ चे उद्देश व राबवावयाचे उपक्रम, इ. स्टॅण्डी व होर्डींगची उभारणी केली.



# राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळेत महा आवास अभियान प्रवास फोटो प्रदर्शन

राज्यात कोरोना महामारी आणि लॉकडाऊनमुळे जवळ जवळ सर्वच योजनांची कामे मंदावली होती. कोरोना काळात सोशल डिस्टन्सींगमुळे लोकांना स्वतःच्या घराचे महत्व पटले. कोरोना महामारीमुळे शासकीय यंत्रणेत आलेली मरगळ दूर करण्यासाठी व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात गतीमानता व गुणवत्ता आणण्यासाठी दिनांक २० नोव्हेंबर, २०२० रोजीच्या आवास दिनाचे औचित्य साधून राज्यात 'महा आवास अभियान-ग्रामीण' राबविण्याचा निर्णय शासनाच्या ग्रामविकास विभागाने घेतला.

या अभियानामुळे कोरोना महामारीच्या काळात देखील लाखो गरीब, बेघर, गरजू व भूमिहीन लाभार्थ्यांचे घरकुलांचे स्वप्न पूर्ण झाले. या अभियानाला आलेले यश पाहता, सर्व भागधारक, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, लाभार्थी व लोक यांचा अभिनाला मिळालेला सक्रीय सहभाग लक्षात घेता हेच सातत्य कायम ठेवण्यासाठी राज्यात सन २०२०-२१ ते आजपर्यंत राज्यात 'महा आवास अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाचा प्रवास सर्वांना कळावा यासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे यांच्या संकल्पनेतून अभियान प्रवासाचे फोटो प्रदर्शन प्रदर्शित केले. या फोटो प्रदर्शनाचं लोकार्पण मा.मंत्री, ग्रामविकास व पंचायत राज श्री.गिरीष महाजन यांच्या शुभहस्ते व मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

या फोटो प्रदर्शनामध्ये अभियानाची संकल्पना, राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळा, विभागस्तरीय, जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय, ग्रामस्तरीय क्षमता बांधणी कार्यशाळा, ग्राम कृती गटाचे गठण, लाभार्थी मेळावे, आढावा बैठका, व्हिडीओ कॉन्फरन्स, क्षेत्रीय भेटी, मंजूरी पत्र वितरण, हप्ते वितरण, भूमिपूजन, ग्रामीण गवंडी प्रशिक्षण, प्रगती पथावरील घरकुले, राष्ट्रीय लोक अदालत, पूर्ण घरकुले, गृहप्रवेश, बहुमजली इमारती, हाऊसिंग कॉलणी, आय.आय.टी. मुंबई यांचे प्रशिक्षण, डेमो हाऊस, कॉप-शॉप, घरकुल मार्ट, लॅण्ड बँक, सॅण्ड बँक, शासकीय योजनांशी कृती संगम, माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम, समन्वय बैठका, पार्टनरशिप व कोलॅबरेशन घोषणा, राज्या बाहेरील अभियास दौरे, सर्व स्तरावरील पुरस्कार वितरण व मिडीया कवरेज, इ. उपक्रमांचे फोटो प्रदर्शित करण्यात आले.



# कोल्हापुर जिल्ह्यात मा.पालकमंत्र्यांच्या शुभहस्ते अमृत महा आवास पुरस्कार वितरण

दिनांक २० ऑक्टोबर, २०२३ रोजी मा.पालकमंत्री, कोल्हापूर श्री.हसन मुश्रीफ यांच्या शुभहस्ते अमृत महा आवास अभियान २०२२-२३ अंतर्गत तालुकास्तरीय अमृत महा आवास अभियान पुरस्कारांचे वितरण कोल्हापूर जिल्ह्यात पंचायत समिती कागल येथे करण्यात आले.

याप्रसंगी मा.खासदार श्री.संजय मंडलिक, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.संतोष पाटील, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती सुषमा देसाई, जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्रीमती शिल्पा पाटील, गट विकास अधिकारी श्री.सुशील संसारे तसेच.विस्तार अधिकारी सरपंच, ग्रामसेवक /ग्रामविकास अधिकारी व पुरस्कारार्थी उपस्थित होते.



# चंद्रपुर जिल्ह्यात अमृत महा आवास पुरस्कार वितरण

दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२३ रोजी पंचायत समिती चंद्रपूर येथे अमृत महा आवास अभियान २०२२-२३ अंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या लाभार्थ्यांना व ग्राम पंचायतींना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. सुभाष पवार यांच्या हस्ते व गट विकास अधिकारी श्री.सपकाळ यांच्या उपस्थितीत अमृत महा आवास अभियान पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच विविध घरकुल योजने विषयी लाभार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.



## मा.राज्यपाल यांची ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या स्टॉल भेट

दिनांक २१ नोव्हेंबर, २०२३ रोजी ग्रामपंचायत मोडाळे, ता. इगतपुरी, जि.नाशिक येथे विकसित भारत संकल्प यात्रा उद्घाटन मा.राज्यपाल श्री.रमेश बैस यांच्या शुभहस्ते व मा.विधानसभा उपाध्यक्ष श्री.नरहरी झिरवाळ, मा.पालकमंत्री, नाशिक श्री.दादाजी भुसे, मा.आमदार श्री.हिरमणजी खोसकर, विभागीय आयुक्त श्री.राधाकृष्ण गमे, जिल्हाधिकारी श्री.जलज शर्मा, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती. अशीमा मित्तल व प्रकल्प संचालक श्रीमती. प्रतिभा संगमनेरे यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

या कार्यक्रमामध्ये सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रचार, प्रसिध्दी व जनजागृतीसाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या वतीने माहिती कक्ष/स्टॉल लावण्यात आले होते. या स्टॉल मध्ये सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांचे फलक, पोस्टर, बॅनर, बाऊचर व घरकुल प्रतिकृती ठेवण्यात आली होती. या स्टॉलला मा.राज्यपाल महोदयांसह सर्व उपस्थित मान्यवरांनी भेट देवून या उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या.




## मोदी आवास घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना मंजूरी पत्र वितरण

दिनांक २३ नोव्हेंबर, २०२३ रोजी महा आवास अभियान २०२३-२४ राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळेप्रसंगी मोदी आवास घरकुल योजने अंतर्गत सन २०२३-२४ मध्ये ३ लाख घरकुले मंजूर झाली असून त्यापैकी काही जिल्ह्यांच्या लाभार्थ्यांना मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री. गिरीष महाजन यांच्या शुभहस्ते व मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. एकनाथ डवले व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे यांच्या प्रमुख उपस्थितीत मंजूरी पत्र वितरीत करण्यात आले.

राज्यात ग्रामीण भागात वास्तव्यास असणाऱ्या इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गासोबतच विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गातील पात्र लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ देण्यासाठी "मोदी आवास घरकुल योजना" राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत सन २०२३-२४ मध्ये ३ लाख, सन २०२४-२५ मध्ये ३ लाख व सन २०२५-२६ मध्ये ४ याप्रमाणे पुढील ३ वर्षामध्ये १० लाख पात्र लाभार्थ्यांना घरकुलांचा लाभ देण्यात येत आहे. या करीता इतर मागास व बहुजन कल्याण विभागांतर्गत रू.१२,००० कोटी निधीची तरदुत केली आहे.

राज्स्तरावरून या योजनेची अंमलबजावणी, संनियंत्रण व समन्वय ग्राम विकास विभागांतर्गत संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण यांचे मार्फत होत असून जिल्हा पातळीवर प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांचेमार्फत करण्यात येत आहे.



## छत्रपती संभाजी नगर येथे घरकुल योजनांच्या उद्दिष्टपूर्ती नियोजनासाठी समन्वय सभा

दिनांक २८ डिसेंबर, २०२३ रोजी जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर येथे जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.विकास मीना यांच्या अध्यक्षतेखाली सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या उद्दिष्टपूर्तीच्या नियोजनासाठी समन्वय सभेचे आयोजन करण्यात आले.

या समन्वय सभेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मोदी आवास घरकुल योजना, प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, अटल बांधकाम कामगार घरकुल योजना व इतर विषयांचा सविस्तर आढावा घेऊन उद्दिष्ट पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले. तसेच नियोजनानुसार उद्दिष्टपूर्तीच्या कामात दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यावर कडक कारवाई करणार असल्याचा ईशारा श्री.विकास मीना यांनी दिला. तसेच ग्राम पातळीवर होणाऱ्या कामाचा नियमित तालुकास्तरावरून अहवाल सादर होणे गरजेचे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

या समन्वय सभेला जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री.अशोक शिरसे, जिल्हा परिषदचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री.ओम प्रकाश रामावत, जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक श्री.राजेंद्र देसले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी(मग्रारोहयो) श्री.अनुपमा नंदनवनकर व सर्व गट विकास अधिकारी उपस्थित होते.



## ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संचालकांच्या समन्वय बैठका

केंद्र व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण, मुल्यमापन व समन्वयासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे यांच्या अध्यक्षतेखाली व उपसंचालक (प्र.आ.यो.) श्री.नीलेश काळे, उपसंचालक श्रीमती राजलक्ष्मी येरपुडे व सहाय्यक संचालक (लेखा) श्रीमती अपर्णा पाटणे यांच्या उपस्थितीत माहे ऑक्टोबर ते डिसेंबर २०२३ या कालावधीमध्ये समन्वय बैठकांचे आयोजन करण्यात आले. या बैठकांना सर्व उप आयुक्त (विकास), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत समितीचे गट विकास अधिकारी उपस्थित होते.

या बैठकांमध्ये केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान(PM-JANMAN), राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना व महा आवास अभियान २०२३-२४ इ. विषयांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच सर्वस्तरावर प्रशासकीय व तांत्रिक अडचणीवर मार्गदर्शन करण्यात आले.

केंद्र शासनाच्या सूचनेनुसार दिनांक ३१ डिसेंबर, २०२३ पर्यंत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत सर्व घरकुले पूर्ण करणे, भूमिहीन लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता करणे, मोदी आवास घरकुल योजने अंतर्गत घरकुलांना मंजुरी देणे, घरकुल बांधकामाच्या प्रगतीनुसार सर्व हप्ते विनाविलंब वितरीत करणे, प्रलंबित घरकुले तात्काळा पूर्ण करणे व महा आवास अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करणे, इ. बाबात डॉ.राजाराम दिघे यांनी चर्चा केली.



## प्रलंबित घरकुले पूर्ण करण्यासाठी लोक अदालत प्रभावी

राज्यात अमृत महा आवास अभियान २०२३-२४ अतंर्गत विविध उपक्रम राबवून ग्रामीण भागातील लोकांचे पक्क्या घरकुलाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सर्वस्तरावरून प्रयत्न करण्यात येत आहे.

परंतु काही लाभार्थ्यांनी घरकुलाचा पहिला हप्ता घेवून १२ महिन्यापेक्षा जास्त कालावधी उलटून अद्यापही घरकुल बांधकामास सुरूवात केली नाही. अशा लाभार्थ्यांना वारंवार बैठका, लाभार्थी मेळावे, गृह भेटी व इतर सर्व मार्गाने समजावण्याचा प्रयत्न केला. तरी या लाभार्थ्यांनी घरकुल बांधकाम सुरू केले नाही. अशा घरकुल लाभार्थ्यांसाठी तालुकास्तरावर कायदेविषयक सहाय्य व सल्ला समितीच्या सहाय्याने 'लोक अदालत' द्वारे लाभार्थ्यांना घरकुल पूर्ण करण्यासाठी प्रवृत्त करण्यात येत आहे. प्रलंबित घरकुले पूर्ण करण्यासाठी 'लोक अदालत' प्रभावी माध्यम ठरले आहे.

लोक अदालत व्दारे प्रलंबित घरकुले पूर्ण करण्यासाठी नांदेड व नंदुरबार जिल्ह्यात मोहीम राबविली जात आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात घरकुल बांधकामास सुरूवात झाली असून जे लाभार्थी घरकुल बांधकाम करण्यास इच्छुक नाही अशा लाभार्थ्यांकडून आर्थिक वसुली करण्यात येत आहे.



## प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान सर्वे पूर्णत्वासाठी समन्वय बैठक

दिनांक ३०डिसेंबर, २०२३ रोजी पुणे जिल्ह्यातील पंचायत समिती मावळ येथे प्रांत,तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी,गट विकास अधिकारी यांनी प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान(PM-JANMAN) बाबत समन्वय बैठक घेवून सर्वे पूर्ण करण्याचे नियोजन केले. यावेळी ग्रामसेवक, मंडल अधिकारी, तलाठी उपस्थित होते.

तसेच ग्रामपंचायत वाडा येथील कातकरी कुटुंबांची माहिती PM-JANMAN अंतर्गत सर्वेची माहिती आवास प्लस ॲप मध्ये भरण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. त्याचप्रमाणे इतरही ग्रामपंचायतीमध्ये अशा प्रकारे सर्वे करून ॲप मध्ये माहिती भरण्याचे नियोजन ग्रामसेवक यांचेशी चर्चा करून करण्यात आले.



# केंद्र व राज्य सरकार यांना ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासंबंधी पॉलिसी इनपुट

## महा आवास अभियान २०२३-२४

"सर्वांसाठी घरे-२०२४" हे केंद्र शासनाचे महत्त्वाचे धोरण असून राज्य शासनाने देखील या धोरणाचा स्विकार केला आहे. या अनुषंगाने राज्यात ग्राम विकास व पंचायत राज विभागा अंतर्गत राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या माध्यमातून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, मोदी आवास घरकुल योजना यासोबतच पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, अतिक्रमण नियमानुकूल करण्याची योजना, इ. ग्रामीण गृहनिर्माण योजना राबविण्यात येत आहेत.

संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास ध्येये (Sustainable Development Goals) मधील ध्येय क्रमांक 11 नुसार किफायतशीर गृहनिर्माण (Affordable Housing) क्षेत्रात काम झाल्यास एकूण 17 SDG पैकी किमान 14 SDG वर सकारात्मक प्रभाव पडणार आहे. यासाठी घरकुलांच्या कामाची प्रगती फक्त संख्यात्मक न राहता गुणात्मक रहावी, नावीन्यपूर्ण कल्पना अंमलात आणून लाभार्थ्यांना सर्व सुविधायुक्त असे घरकुले उपलब्ध करुन द्यावीत, तसेच नैसर्गिक आपत्तीस सक्षमपणे सामोरे जाणारे घरकुले बांधण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा असे शासनाचे ध्येय आहे.

यासाठी राज्यात दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ ते दिनांक ०५ जून, २०२१ या कालावधीत महा आवास अभियान-ग्रामीण राबविण्यात आले. या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये आलेली गतिमानता व गुणवत्तेमध्ये सातत्या राहण्यासाठी दिनांक २० नोव्हेंबर, २०२१ ते दिनांक ३० जून, २०२२ या कालावधीत महा आवास अभियान २.० राबविण्यात आले. तसेच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात जलद गतीने लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ मिळावा यासाठी दिनांक ०१ जुलै, २०२२ ते दिनांक १५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत अमृत घरकुल मोहीम राबविण्यात आली. गतवर्षी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्यात दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या राष्ट्रीय आवास दिना पासून ते दिनांक ०५ जून, २०२३ या कालावधीत "अमृत महा आवास अभियान २०२२-२३" राबविण्यात आले.

त्याचप्रमाणे ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये जेथे घरकुल बांधकामासाठी जागेची कमतरता आहे अशा ठिकाणी बहुमजली इमारती, जेथे जागेची उपलब्धता आहे अशा ठिकाणी गृह संकुले, जागेच्या वाढत्या किंमती लक्षात घेता हाऊसिंग अपार्टमेंट, डेमो हाऊस मध्ये कॉप-शॉप, घरकुल बांधकाम साहित्य वाजवी दरात व नजीकच्या ठिकाणी उपलब्धतेसाठी घरकुल मार्ट, प्रशिक्षित गवंडी उपलब्धतेसाठी गवंड्यांचे पॅनेल तयार करणे, लाभार्थी व लोकाना मार्गदर्शनासाठी महा आवास हेल्प लाईन, रिलायन्स, हुडको, आय.आय.टी. बॉम्बे, रोटरी इंटरनॅशनल, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ या सारख्या नामांकीत संस्थांशी भागिदारी व नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर यासाठी राज्याबाहेर दौरे या सारखे अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राज्यात राबविण्यात आले. या सर्व उपक्रमांचे कौतुक महाराष्ट्रासह देशपातळीवरही होत आहे.

ग्राम विकास व पंचायत राज विभागा अंतर्गत राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाला ग्रामीण गृहनिर्माण योजना संबंधित धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी अनेक इनपुट दिले. त्याचाच एक भाग म्हणून सन २०२०-२१, सन २०२१-२२ व सन २०२२-२३ या ३ वर्षात महा आवास अभियानामुळे लाखो गरिब, गरजू, बेघर व भूमिहीन लाभार्थ्यांचे स्वतःच्या पक्क्या घराचे स्वप्न झाले असून यापुढेही सन २०२३-२४ मध्ये महा आवास अभियान राबविण्याचा प्रस्ताव राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण कार्यालया मार्फत सादर केला. शासनाने आजपर्यंत महा आवास अभियानाला आलेल्या यशाची दखल घेत महा आवास अभियान २०२३-२४ राबविण्यास मान्यता दिली.

दरवर्षी २० नोव्हेंबर हा राष्ट्रीय आवास दिन म्हणून राबविण्यात येतो. या वर्षी राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्यात दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ ते दिनांक ३१ मार्च २०२४ या कालावधीत "महा आवास अभियान २०२३-२४" राबविण्यात येत आहे. "सर्वांसाठी घरे-२०२४" या शासनाच्या धोरणांतर्गत अभियान कालावधीत विविध उपक्रम राबवून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे व गुणवत्ता आणणे हा या अभियानाचा हेतू आहे.






# प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण

## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर २०२३

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट (PWL+Awaas+) | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक | राष्ट्रीय रँक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | ५०५६ | ५०५६ | ४९३७ | ९७.६५% | १ | ३८ |
| २ | रत्नागिरी | ९७४१ | ९७४१ | ९४३० | ९६.८१% | २ | ५१ |
| ३ | रायगड | ९७६७ | ९७६७ | ९३७६ | ९६.००% | ४ | ८८ |
| ४ | पालघर | ३५१६६ | ३५१६६ | ३३६३१ | ९५.६३% | ५ | १०९ |
| ५ | ठाणे | ९५४८ | ९५४८ | ९०१३ | ९४.४०% | ७ | १६३ |
| | **कोकण विभाग** | ६९२७८ | ६९२७८ | ६६३८७ | **९५.८३%** | १ | |
| ६ | गोंदिया | ९५६७९ | ९५६७९ | ९२०३६ | ९६.१९% | ३ | २२३ |
| ७ | गडचिरोली | ३१५५१ | ३१५५१ | २८९३५ | ९१.७१% | १० | ३२८ |
| ८ | वर्धा | १७६४१ | १७६४१ | १६०४१ | ९०.९३% | १२ | ९३ |
| ९ | भंडारा | ६३५४३ | ६३५४३ | ५७५९४ | ९०.६४% | १३ | ३३७ |
| १० | नागपूर | ३६०८३ | ३६०८३ | ३२६५७ | ९०.५१% | १४ | ३४५ |
| ११ | चंद्रपूर | ४२०१२ | ४२०१२ | ३७२३१ | ८८.६२% | १७ | २४२ |
| | **नागपूर विभाग** | २८६५०९ | २८६५०९ | २६४४९४ | **९२.३२%** | २ | |
| १२ | नाशिक | ८९२७६ | ८९२७६ | ८३३७० | ९३.३८% | ८ | २२४ |
| १३ | नंदुरबार | ११८३९३ | ११८३९३ | १०८७५२ | ९१.८६% | ९ | ३५७ |
| १४ | अहमदनगर | ६०१६९ | ६०१६९ | ५४९३३ | ९१.३०% | ११ | १२४ |
| १५ | धुळे | ६४६२५ | ६४६२५ | ५८०३६ | ८९.८०% | १५ | ३३४ |
| १६ | जळगाव | ७७१८५ | ७७१८५ | ६४७६३ | ८३.९१% | २४ | ४६५ |
| | **नाशिक विभाग** | ४०९६४८ | ४०९६४८ | ३६९८५४ | **९०.२९%** | ३ | |
| १७ | सातारा | १४३३४ | १४३३४ | १३५९७ | ९४.८६% | ६ | २२ |
| १८ | कोल्हापूर | १६९४२ | १६९४२ | १४९९४ | ८८.५०% | १८ | ११० |
| १९ | सांगली | २०६४९ | २०६४९ | १८०७६ | ८७.५४% | १९ | ४५१ |
| २० | सोलापूर | ४४८४६ | ४४८४६ | ३८३५४ | ८५.५२% | २० | ३५९ |
| २१ | पुणे | १९०८२ | १९०८२ | १६१९० | ८४.८४% | २२ | ४३८ |
| | **पुणे विभाग** | ११५८५३ | ११५८५३ | १०१२११ | **८७.३६%** | ४ | |
| २२ | अकोला | ४६५९२ | ४६५९२ | ४१६६६ | ८९.४३% | १६ | ३९९ |
| २३ | यवतमाळ | ६३१६१ | ६३१६१ | ५३९४९ | ८५.४२% | २१ | २६० |
| २४ | अमरावती | ९१८४४ | ९१८४४ | ७७२११ | ८४.०७% | २३ | ४७१ |
| २५ | वाशिम | १८७६९ | १८७६९ | १५३७७ | ८१.९३% | २५ | २४० |
| २६ | बुलढाणा | ४४२८७ | ४४२८७ | ३२०९३ | ७२.४७% | ३४ | ४४८ |
| | **अमरावती विभाग** | २६४६५३ | २६४६५३ | २२०२९६ | **८३.२४%** | ५ | |
| २७ | छत्रपती संभाजी नगर | ३६०७२ | ३६०७२ | २९५४२ | ८१.९०% | २६ | ३२५ |
| २८ | नांदेड | ६८३१५ | ६८३१५ | ५४६२९ | ७९.९७% | २७ | ५२५ |
| २९ | जालना | २३८७७ | २३८७७ | १८८८५ | ७९.०९% | २८ | ३७८ |
| ३० | हिंगोली | १७८५५ | १७८५५ | १३८२४ | ७७.४२% | २९ | १५४ |
| ३१ | बीड | ३४५८९ | ३४५८९ | २६४३४ | ७६.४२% | ३० | ४३४ |
| ३२ | लातूर | २०११५ | २०११५ | १५३४९ | ७६.३१% | ३१ | ४३२ |
| ३३ | धाराशिव | १३७३६ | १३७३६ | १०३१७ | ७५.११% | ३२ | ४३० |
| ३४ | परभणी | १८७१६ | १८७१६ | १४००१ | ७४.८१% | ३३ | २४९ |
| | **छत्रपती संभाजी नगर विभाग** | **२३३२७५** | **२३३२७५** | **१८२९८१** | ७८.४४% | ६ | |
| | **एकूण** | **१३७९२१६** | **१३७९२१६** | **१२०५२२३** | ८७.३८% | | |

# रमाई आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर २०२३

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | २१५८ | २०६८ | १९५२ | ९४.३९% | १ |
| २ | रत्नागिरी | ६७५० | ६३९८ | ६०२२ | ९४.१२% | २ |
| ३ | रायगड | २५५१ | २०२८ | १८४८ | ९१.१२% | ३ |
| ४ | पालघर | ५५७ | ४५८ | ४०३ | ८७.९९% | ५ |
| ५ | ठाणे | १५६६ | १२४५ | १०३६ | ८३.२१% | १० |
| | **कोकण विभाग** | **१३५८२** | **१२१९७** | **११२६१** | **९२.३३%** | **१** |
| ६ | अहमदनगर | ३१०७४ | ३००९६ | २६०८१ | ८६.६६% | ६ |
| ७ | नाशिक | २२२३३ | ११८२९ | ९६५४ | ८१.६१% | १४ |
| ८ | धुळे | १२४०१ | ८५४२ | ६६३४ | ७७.६६% | १८ |
| ९ | नंदुरबार | ४३६४ | ३४०९ | २६०३ | ७६.३६% | २१ |
| १० | जळगाव | २०३२४ | १८३२३ | १३८७९ | ७५.७५% | २२ |
| | **नाशिक विभाग** | **९०३९६** | **७२१९९** | **५८८५१** | **८१.५१%** | **२** |
| ११ | सातारा | ११२०३ | ११२०३ | ९८९८ | ८८.३५% | ४ |
| १२ | पुणे | १०३१७ | ९४६३ | ७८९५ | ८३.४३% | ९ |
| १३ | सांगली | १००१४ | ९०१० | ७३५९ | ८१.६८% | १३ |
| १४ | सोलापूर | २२४३९ | १९४२१ | १५०६९ | ७७.५९% | १९ |
| १५ | कोल्हापूर | १६१७३ | १५०३३ | ११०७० | ७३.६४% | २५ |
| | **पुणे विभाग** | **७०१४६** | **६४१३०** | **५१२९१** | **७९.९८%** | **३** |
| १६ | गडचिरोली | ७८८० | ६८०५ | ५६३९ | ८२.८७% | ११ |
| १७ | गोंदिया | १३०७८ | १०५६४ | ८६७८ | ८२.१५% | १२ |
| १८ | भंडारा | १४५९० | ११५८६ | ९३४८ | ८०.६८% | १६ |
| १९ | वर्धा | ८५६९ | ८५६० | ६६३१ | ७७.४६% | २० |
| २० | चंद्रपूर | २५१५४ | २०३१९ | १४७६२ | ७२.६५% | २६ |
| २१ | नागपूर | २००३९ | १०४५० | ७२०८ | ६८.९८% | ३० |
| | **नागपूर विभाग** | **८९३१०** | **६८२८४** | **५२२६६** | **७६.५४%** | **४** |
| २२ | यवतमाळ | २०१०१ | १४३४५ | १२३२३ | ८५.९०% | ७ |
| २३ | बुलढाणा | २४३१९ | १८५५४ | १४६५० | ७८.९६% | १७ |
| २४ | अमरावती | २००४९ | १६५०६ | ११९३४ | ७२.३०% | २७ |
| २५ | वाशिम | १२७९१ | १०७९५ | ७६५६ | ७०.९२% | २८ |
| २६ | अकोला | २८५९२ | २०४३७ | १३७३१ | ६७.१९% | ३१ |
| | **अमरावती विभाग** | **१०५८५२** | **८०६३७** | **६०२९४** | **७४.७७%** | **५** |
| २७ | परभणी | २४४२३ | १६७३६ | १४०५२ | ८३.९६% | ८ |
| २८ | लातूर | ३३२८२ | २६२०३ | २१२८९ | ८१.२५% | १५ |
| २९ | छत्रपती संभाजी नगर | २९११० | २१९२४ | १६४४३ | ७५.००% | २३ |
| ३० | जालना | ३५७३५ | १८७७८ | १३८७९ | ७३.९१% | २४ |
| ३१ | बीड | ३०७३५ | २६०२५ | १८३९६ | ७०.६९% | २९ |
| ३२ | धाराशिव | २१४४७ | १७९९९ | १२०६३ | ६७.०२% | ३२ |
| ३३ | नांदेड | २५९५० | २२१८३ | १४११४ | ६३.६३% | ३३ |
| ३४ | हिंगोली | २०७२८ | १३९७४ | ८७०० | ६२.२६% | ३४ |
| | **छत्रपती संभाजी नगर विभाग** | **२२१४१०** | **१६३८२२** | **११८९३६** | **७२.६०%** | **६** |
| | **एकूण** | **५९०६९६** | **४६१२६९** | **३५२८९९** | **७६.५१%** | |

# शबरी आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर २०२३

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सोलापूर | ८९४ | ६५४ | ५९० | ९०.२१% | ३ |
| २ | सातारा | १९७ | १९७ | १७३ | ८७.८२% | ४ |
| ३ | सांगली | ८० | ५० | ४३ | ८६.००% | ५ |
| ४ | पुणे | ६७३६ | ४४९२ | २७२९ | ६०.७५% | १७ |
| ५ | कोल्हापूर | ६० | २५ | १३ | ५२.००% | २६ |
| | **पुणे विभाग** | **७९६७** | **५४१८** | **३५४८** | **६५.४९%** | **१** |
| ६ | अहमदनगर | ८६४६ | ६२५३ | ४४६९ | ७१.४७% | ९ |
| ७ | धुळे | १८५१८ | ११३१३ | ७९१५ | ६९.९६% | ११ |
| ८ | नाशिक | २७४५६ | १५९७३ | १०३६४ | ६४.८८% | १२ |
| ९ | नंदुरबार | ४७०४६ | १५५२१ | ९०९४ | ५८.५९% | १९ |
| १० | जळगाव | १३३३१ | १०४२० | ५४४१ | ५२.२२% | २५ |
| | **नाशिक विभाग** | **११४९९७** | **५९४८०** | **३७२८३** | **६२.६८%** | **२** |
| ११ | सिंधुदुर्ग | ४३ | २९ | २९ | १००.००% | १ |
| १२ | रत्नागिरी | ३४० | २५६ | २४३ | ९४.९२% | २ |
| १३ | पालघर | १४३८५ | ११९५० | ७६५५ | ६४.०६% | १३ |
| १४ | ठाणे | ५४३० | ३४१३ | १९३७ | ५६.७५% | २२ |
| १५ | रायगड | ६६१० | ६१३७ | २७३५ | ४४.५७% | २९ |
| | **कोकण विभाग** | **२६८०८** | **२१७८५** | **१२५९९** | **५७.८३%** | **३** |
| १६ | यवतमाळ | १४३२२ | ९७६२ | ५६३६ | ५७.७३% | २१ |
| १७ | अमरावती | १५२३५ | ७२६२ | ४०१६ | ५५.३०% | २३ |
| १८ | बुलढाणा | ४१९१ | २२३७ | १०११ | ४५.१९% | २८ |
| १९ | वाशिम | २९७० | २१४६ | ९१६ | ४२.६८% | ३० |
| २० | अकोला | ५८१५ | ३४६१ | १३५३ | ३९.०९% | ३३ |
| | **अमरावती विभाग** | **४२५३३** | **२४८६८** | **१२९३२** | **५२.००%** | **४** |
| २१ | लातूर | १५३८ | ६०७ | ४९४ | ८१.३८% | ६ |
| २२ | नांदेड | ७९९१ | १३८८ | १०२१ | ७३.५६% | ८ |
| २३ | छत्रपती संभाजी नगर | ७७८७ | ३६७५ | २६०९ | ७०.९९% | १० |
| २४ | जालना | २९५६ | ७५३ | ४७४ | ६२.९५% | १४ |
| २५ | धाराशिव | ५४९ | ३६९ | २३० | ६२.३३% | १५ |
| २६ | बीड | २२३० | ९३२ | ५६६ | ६०.७३% | १८ |
| २७ | परभणी | ३८८७ | १७८३ | ७१४ | ४०.०४% | ३१ |
| २८ | हिंगोली | १८०३५ | १०१९७ | ४०३६ | ३९.५८% | ३२ |
| | **छत्रपती संभाजी नगर विभाग** | **४४९७३** | **१९७०४** | **१०१४४** | **५१.४८%** | **५** |
| २९ | भंडारा | ६३३६ | ४८९२ | ३८७९ | ७९.२९% | ७ |
| ३० | गडचिरोली | १०९५१ | ८५५५ | ५२७४ | ६१.६५% | १६ |
| ३१ | गोंदिया | ५५९९ | ४७८८ | २७९३ | ५८.३३% | २० |
| ३२ | वर्धा | ५६९२ | ५६७३ | २९८३ | ५२.५८% | २४ |
| ३३ | चंद्रपूर | २३१८२ | १२६९२ | ६१७२ | ४८.६३% | २७ |
| ३४ | नागपूर | १३१८८ | ११०७८ | २८२२ | २५.४७% | ३४ |
| | **नागपूर विभाग** | **६४९४८** | **४७६७८** | **२३९२३** | **५०.१८%** | **६** |
| | **एकूण** | **३०२२२६** | **१७८९३३** | **१००४२९** | **५६.१३%** | |

# पारधी आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर २०२३

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | धुळे | ४३२ | ४३२ | ४२० | ९७.२२% | ९ |
| २ | अहमदनगर | १९८ | १९८ | १८३ | ९२.४२% | १४ |
| ३ | जळगाव | ५७० | ५६९ | ५१५ | ९०.५१% | १६ |
| ४ | नाशिक | १४३ | १३७ | ११२ | ८१.७५% | २२ |
| ५ | नंदुरबार | १० | ० | ० | ०.००% | २९ |
| **नाशिक विभाग** | | **१३५३** | **१३३६** | **१२३०** | **९२.०७%** | **१** |
| ६ | वाशिम | ६४ | ६४ | ६३ | ९८.४४% | ७ |
| ७ | बुलढाणा | ३७१ | ३७१ | ३५४ | ९५.४२% | ११ |
| ८ | अमरावती | ४५१ | ४४४ | ४१६ | ९३.६९% | १२ |
| ९ | अकोला | ३७४ | ३७३ | ३४८ | ९३.३०% | १३ |
| १० | यवतमाळ | ५९४ | ५९३ | ४८४ | ८१.६२% | २३ |
| **अमरावती विभाग** | | **१८५४** | **१८४५** | **१६६५** | **९०.२४%** | **२** |
| ११ | हिंगोली | ३५ | ३५ | ३५ | १००.००% | १ |
| १२ | लातूर | १७ | १३ | १३ | १००.००% | ३ |
| १३ | नांदेड | ५० | ४२ | ४२ | १००.००% | ४ |
| १४ | परभणी | ५६ | ५६ | ५६ | १००.००% | ५ |
| १५ | बीड | ९२ | ८६ | ७८ | ९०.७०% | १५ |
| १६ | छत्रपती संभाजी नगर | ५७ | ५१ | ४५ | ८८.२४% | १८ |
| १७ | जालना | ३८ | ३६ | ३१ | ८६.११% | २० |
| १८ | धाराशिव | २४७ | २४७ | २०६ | ८३.४०% | २१ |
| **छत्रपती संभाजी नगर विभाग** | | **५९२** | **५६६** | **५०६** | **८९.४०%** | **३** |
| १९ | कोल्हापूर | ७ | ७ | ७ | १००.००% | २ |
| २० | सातारा | २४ | २४ | २४ | १००.००% | ६ |
| २१ | सोलापूर | २३१ | २०२ | १९५ | ९६.५३% | १० |
| २२ | सांगली | ३८ | २६ | २३ | ८८.४६% | १७ |
| २३ | पुणे | १८८ | १७४ | १३० | ७४.७१% | २४ |
| **पुणे विभाग** | | **४८८** | **४३३** | **३७९** | **८७.५३%** | **४** |
| २४ | वर्धा | ५० | ५० | ४९ | ९८.००% | ८ |
| २५ | नागपूर | ४८ | ४८ | ४२ | ८७.५०% | १९ |
| २६ | चंद्रपूर | ३५ | ३३ | २१ | ६३.६४% | २५ |
| **नागपूर विभाग** | | **१३३** | **१३१** | **११२** | **८५.५०%** | **५** |
| २७ | रायगड | २ | ० | ० | ०.००% | ३१ |
| २८ | रत्नागिरी | १ | ० | ० | ०.००% | ३२ |
| **कोकण विभाग** | | **३** | **०** | **०** | **०.००%** | **६** |
| **एकूण** | | **४४२३** | **४३११** | **३८९२** | **९०.२८%** | |

# आदिम आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर २०२३

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | ६६ | ५० | ५० | १००.००% | १ |
| २ | पालघर | ११३१ | ११२८ | १०५९ | ९३.८८% | २ |
| ३ | रायगड | १३९४ | १३९४ | १२८५ | ९२.१८% | ३ |
| ४ | ठाणे | १५७८ | १५७२ | १४३९ | ९१.५४% | ४ |
| ५ | रत्नागिरी | ११ | ११ | ७ | ६३.६४% | ८ |
| **कोकण विभाग** | | ४१८० | ४१५५ | ३८४० | ९२.४२% | १ |
| ६ | नांदेड | ४१९ | १८१ | १३९ | ७६.८०% | ६ |
| **छत्रपती संभाजी नगर विभाग** | | ४१९ | १८१ | १३९ | ७६.८०% | २ |
| ७ | गडचिरोली | १७७८ | १७५२ | १५०२ | ८५.७३% | ५ |
| ८ | चंद्रपूर | ७२३ | ६७३ | ४४७ | ६६.४२% | ७ |
| ९ | वर्धा | ३९६ | ३९४ | १५३ | ३८.८३% | १० |
| **नागपूर विभाग** | | २८९७ | २८१९ | २१०२ | ७४.५७% | ३ |
| १० | यवतमाळ | ४७८४ | ४६६७ | २६५३ | ५६.८५% | ९ |
| **अमरावती विभाग** | | ४७८४ | ४६६७ | २६५३ | ५६.८५% | ४ |
| ११ | नाशिक | ९८ | ३७ | १२ | ३२.४३% | ११ |
| **नाशिक विभाग** | | ९८ | ३७ | १२ | ३२.४३% | ५ |
| १२ | पुणे | ७५ | ७१ | १५ | २१.१३% | १२ |
| **पुणे विभाग** | | ७५ | ७१ | १५ | २१.१३% | ६ |
| **एकूण** | | १२४५३ | ११९३० | ८७६१ | ७३.४४% | |

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर २०२३

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट (PWL+Awaas+) | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बुलढाणा | ८६ | ७९ | १२ | १५.१९% | १ |
| २ | वाशिम | ४१ | ३९ | २ | ५.१३% | ४ |
| **अमरावती विभाग** | | १२७ | ११८ | १४ | ११.८६% | १ |
| ३ | कोल्हापूर | ५२५ | ४६५ | २९ | ६.२४% | ३ |
| **पुणे विभाग** | | ५२५ | ४६५ | २९ | ६.२४% | २ |
| ४ | भंडारा | २२ | २१ | १ | ४.७६% | ५ |
| ५ | गोंदिया | १५ | ० | ० | ०.००% | ७ |
| **नागपूर विभाग** | | ३७ | २१ | १ | ४.७६% | ३ |
| ६ | जालना | १०५ | १०१ | १२ | ११.८८% | २ |
| ७ | लातूर | ८३३ | ३१ | ० | ०.००% | ८ |
| ८ | परभणी | २५० | २२६ | ० | ०.००% | ९ |
| **छत्रपती संभाजी नगर विभाग** | | ११८८ | ३५८ | १२ | ३.३५% | ४ |
| ९ | जळगाव | १९२ | १६७ | ३ | १.८०% | ६ |
| नाशिक विभाग | | १९२ | १६७ | ३ | १.८०% | ५ |
| १० | रायगड | १२ | १२ | ० | ०.००% | १० |
| **कोकण विभाग** | | १२ | १२ | ० | ०.००% | ६ |
| **एकूण** | | २०८१ | ११४१ | ५९ | ५.१७% | |

# यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर २०२३

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रत्नागिरी | ९५ | ७३ | ७१ | ९७.२६% | २ |
| कोकण विभाग | | ९५ | ७३ | ७१ | ९७.२६% | १ |
| २ | सातारा | १०८ | १०८ | ८६ | ७९.६३% | ३ |
| ३ | कोल्हापूर | ६५ | ६५ | ४८ | ७३.८५% | ४ |
| ४ | सोलापूर | १४ | १४ | ३ | २१.४३% | ८ |
| ५ | पुणे | २० | ० | ० | ०.००% | १८ |
| पुणे विभाग | | २०७ | १८७ | १३७ | ७३.२६% | २ |
| ६ | अमरावती | ५०७ | ३९३ | २४२ | ६१.५८% | ६ |
| ७ | यवतमाळ | २१७९ | १६६७ | ४८ | २.८८% | १३ |
| अमरावती विभाग | | २६८६ | २०६० | २९० | १४.०८% | ३ |
| ८ | धाराशिव | १९३४ | ४९८ | २६२ | ५२.६१% | ७ |
| ९ | लातूर | ७७ | ७१ | १० | १४.०८% | ९ |
| १० | परभणी | ४४४ | २४८ | १३ | ५.२४% | ११ |
| ११ | जालना | २२२३ | १७५४ | ३० | १.७१% | १४ |
| छत्रपती संभाजी नगर विभाग | | ४६७८ | २५७१ | ३१५ | १२.२५% | ४ |
| १२ | गोंदिया | २० | २० | २० | १००.००% | १ |
| १३ | नागपूर | १६ | १२ | ८ | ६६.६७% | ५ |
| १४ | चंद्रपूर | ५४६१ | ४३८४ | ३६० | ८.२१% | १० |
| १५ | भंडारा | १२६३ | १२०१ | ४८ | ४.००% | १२ |
| नागपूर विभाग | | ६७६० | ५६१७ | ४३६ | ७.७६% | 5 |
| १६ | अहमदनगर | २० | २० | ० | ०.००% | १५ |
| १७ | धुळे | १४२ | ११७ | ० | ०.००% | १६ |
| १८ | नंदुरबार | ३५ | ० | ० | ०.००% | १७ |
| नाशिक विभाग | | १९७ | १३७ | ० | 0.00% | ६ |
| एकूण | | १४६२३ | १०६४५ | १२४९ | ११.७३% | |

# मोदी आवास घरकुल योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर २०२३

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सातारा | १७७७ | १४०६ | ० | ७९.१२% | २ |
| २ | सांगली | १९५८ | ११८३ | ० | ६०.४२% | ३ |
| ३ | सोलापूर | ११०१९ | ५५५५ | ० | ५०.४१% | ४ |
| ४ | कोल्हापूर | २०३१ | ६६९ | ० | ३२.९४% | ९ |
| ५ | पुणे | १५२१ | ७५ | ० | ४.९३% | ३३ |
| | **पुणे विभाग** | **१८३०६** | **८८८८** | **०** | **४८.५५%** | **१** |
| ६ | अहमदनगर | ४३५६ | ४३३१ | ० | ९९.४३% | १ |
| ७ | धुळे | ९७०९ | २५०३ | ० | २५.७८% | १२ |
| ८ | नाशिक | ६९८१ | १३७१ | ० | १९.६४% | १७ |
| ९ | जळगाव | २९५३१ | ५७५० | ० | १९.४७% | १८ |
| १० | नंदुरबार | २८७६ | ४३३ | ० | १५.०६% | २५ |
| | **नाशिक विभाग** | **५३४५३** | **१४३८८** | **०** | **२६.९२%** | **२** |
| ११ | पालघर | ४५८ | १९१ | ० | ४१.७०% | ६ |
| १२ | सिंधुदुर्ग | १३०८ | ४५९ | ० | ३५.०९% | ८ |
| १३ | रत्नागिरी | ६३५६ | १४८० | ० | २३.२९% | १३ |
| १४ | रायगड | २४५६ | ४०९ | ० | १६.६५% | २१ |
| १५ | ठाणे | २५३८ | ३०३ | ० | ११.९४% | २८ |
| | **कोकण विभाग** | **१३११६** | **२८४२** | **०** | **२१.६७%** | **३** |
| १६ | गडचिरोली | ६५४८ | २४२३ | ० | ३७.००% | ७ |
| १७ | वर्धा | ४९६५ | १५०६ | ० | ३०.३३% | १० |
| १८ | नागपूर | ६७४७ | १५०६ | ० | २२.३२% | १४ |
| १९ | चंद्रपूर | १०८७४ | १७९८ | ० | १६.५३% | २२ |
| २० | भंडारा | ११०३३ | १८१९ | ० | १६.४९% | २३ |
| २१ | गोंदिया | १४४२९ | ८३३ | ० | ५.७७% | ३१ |
| | **नागपूर विभाग** | **५४५९६** | **९८८५** | **०** | **१८.११%** | **४** |
| २२ | वाशिम | १२४५५ | ५६९६ | ० | ४५.७३% | ५ |
| २३ | अकोला | ७३५३ | १३९५ | ० | १८.९७% | १९ |
| २४ | यवतमाळ | २९९९९ | ४१०४ | ० | १३.६८% | २६ |
| २५ | अमरावती | १४१७८ | १७४५ | ० | १२.३१% | २७ |
| २६ | बुलढाणा | १७०५५ | ८७९ | ० | ५.१५% | ३२ |
| | **अमरावती विभाग** | **८१०४०** | **१३८१९** | **०** | **१७.०५%** | **५** |
| २७ | धाराशिव | २२७४ | ६५७ | ० | २८.८९% | ११ |
| २८ | छत्रपती संभाजी नगर | ५८१२ | १२०० | ० | २०.६५% | १५ |
| २९ | जालना | ८४९६ | १६७० | ० | १९.६६% | १६ |
| ३० | हिंगोली | ३३५४ | ५६१ | ० | १६.७३% | २० |
| ३१ | लातूर | ६३१८ | १००६ | ० | १५.९२% | २४ |
| ३२ | नांदेड | २३५९८ | २५०८ | ० | १०.६३% | २९ |
| ३३ | परभणी | १३५९६ | ८६५ | ० | ६.३६% | ३० |
| ३४ | बीड | १६०४१ | ३५० | ० | २.१८% | ३४ |
| | **छत्रपती संभाजी नगर विभाग** | **७९४८९** | **८८१७** | **०** | **११.०९%** | **६** |
| | **एकूण** | **३०००००** | **५८६३९** | **०** | **१९.५५%** | |

# महा आवास अभियान मध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी नागपूर विभागाला प्रथम क्रमांकांचा राज्यस्तरीय पुरस्कार

नागपुर विभागात नागपूर, वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यांचा समावेश आहे. नागपुर महाराष्ट्र राज्याची उपराजधानी असून नागपुर विभाग धार्मीक स्थळे, नद्या, गड, किल्ले, खनिज व संत्रा याकरीता प्रसिध्द आहे. नागपुर विभागीय आयुक्तांचे कार्यालय सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर येथे असून विभागीय आयुक्त हे महसूली प्रमुख आणि जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदांचे नियंत्रक आहे. तसेच विकास आणि प्रशासकीय बाबींसाठी शासनाकडून नेमण्यात आलेल्या विविध विभागस्तरीय समित्यांचे ते प्रमुख असतात.

"महा आवास अभियान २०२१-२२" या अभियान कालावधीत राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे मूल्यमापन करून केलेल्या सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग यांची 'महा आवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार' सर्वोत्कृष्ट विभाग म्हणून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मध्ये प्रथम क्रमांकाच्या व राज्य पुरस्कृत आवास योजनांमध्ये द्वितीय क्रमांकाच्या पुरस्कारासाठी राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती मार्फत निवड करण्यात आली.

त्यांच्या या सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी महाराष्ट्र राज्याचे मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री.गिरीष महाजन यांच्या शुभहस्ते व मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. एकनाथ डवले व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक २३ नोव्हेंबर, २०२३ रोजी राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार स्वरूप प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले.

नागपूर विभागाच्या या उल्लेखनिय कामगिरीचे श्रेय विभागीय आयुक्त, श्रीमती विजयलक्ष्मी बिदरी, उपायुक्त (विकास), श्री. कमलकिशोर फुटाणे, सहाय्यक आयुक्त (विकास) श्रीमती स्वाती इसाये व विभागीय प्रोग्रामर श्री. शुभम हर्षे यांच्यासह विभागस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती सदस्यांचे आहे.

"सर्वांसाठी घरे-२०२४" शासनाच्या या धोरणा अंतर्गत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणीच्या कामास गतिमान करणे व गुणवत्ता आणणे यासाठी दिनांक २० नोव्हेंबर, २०२१ ते ३० जून, २०२२ या कालावधीत राज्यात "महा आवास अभियान २०२१-२२" या अभियानाची अंमलबजावणी करण्यात आली. नागपूर विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये अभियान कालावधीत विविध उपक्रम राबवून ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामांमध्ये गतिमानता आली आहे. तसेच सर्वांचा सक्रीय सहभाग व ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रामध्ये नाविण्यपूर्ण उपक्रमांच्या अंमलबजावणीमुळे घरकुल बांधकाम गुणवत्तापूर्ण झाले आहे.

कोविड-19 च्या प्रादुर्भावामुळे योजनेच्या अंमलबजावणीत मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण झाला होता. परंतु अशा या परिस्थितीत राज्य शासनाच्या ग्राम विकास व पंचायत राज विभागाने राबविलेल्या "महा आवास अभियान" या अभियानामुळे सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांचे काम गतिमान होवून नागपूर विबागात लाखो लाभार्थ्यांना घरकुलांचा लाभ मिळाला आहे. या अभियानात कोरोना काळात देखील उत्तमरित्या नियोजन करून ग्रामीण भागात गवंडी प्रशिक्षण देऊन चांगल्या दर्जाची घरे बांधण्यात येत आली आहेत. "उमेद" अभियानातील महिला बचत समूहांनी घरकुल मार्ट सुरु करून घरे उभारण्यासाठी लागणारे सर्व साहित्य रास्त दरात स्थानिक ठिकाणी उपलब्ध करून दिले. असे विभागीय आयुक्त, श्रीमती विजयलक्ष्मी बिदरी यांनी सांगितले.

या अभियानाची प्रभावी व यशस्वी अंमलबजावणीसाठी मी व माझे अधिकारी/कर्मचारी यांनी अभियान कालावधीत साप्ताहीक आढावा घेऊन सर्व जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प संचालक, गट विकास अधिकारी व संबंधितांना आवश्यक सूचना देऊन अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी प्रेरित केले. या अभियानाच्या यशस्वितेसाठी विभागातील सर्व जिल्हाधिकारी, सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उपायुक्त (विकास), सहाय्यक आयुक्त (विकास), व विभाग/जिल्हा स्तरीय क्षेत्रीय यंत्रणांचे इतर सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी दिलेल्या मोलाच्या योगदानामुळे नागपूर विभागाला या अभियानात मिळालेल्या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी सर्व यंत्रणेचे अभिनंदन श्रीमती विजयलक्ष्मी बिदरी यांनी केले.





# महा आवास अभियान मध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी खोलापूर ग्रामपंचायतीचा राज्यस्तरीय पुरस्कार देवून गौरव

खोलापूर ग्रामपंचायत भातकुली तालुक्यातील अमरावती जिल्ह्यामध्ये असून या ग्रामपंचायतीचे क्षेत्रफळ मोठ्या आवारात पसरले आहे. या ग्रामपंचायतीमध्ये सर्व धर्माचे लोक राहतात. खोलापूर ग्रामपंचायतीची एकूण लोकसंख्या ११,६४६ इतकी असून एकूण कुटूंब संख्या २,४५४ आहे. तसेच या गावात विविध आवास योजने अंतर्गत एकूण ८७४ लाभार्थ्यांची घरकूले पूर्ण झाली आहेत.

"महा आवास अभियान २०२१-२२" या अभियान कालावधीत राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे मूल्यमापन करून राज्य पुरस्कृत आवास योजनां मध्ये केलेल्या सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी ग्रामपंचायत खोलापूर, तालुका भातकुली, जिल्हा अमरावती यांची 'महा आवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार' सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत म्हणून तृतीय क्रमांकाच्या पुरस्कारासाठी राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती मार्फत निवड करण्यात आली आहे.

त्यांच्या या सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी महाराष्ट्र राज्याचे मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री.गिरीष महाजन यांच्या शुभहस्ते व मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. एकनाथ डवले व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक २३ नोव्हेंबर, २०२३ रोजी राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार स्वरूप प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले.

"महा आवास अभियान २०२१-२२" अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण आवास योजनांमध्ये विविध उपक्रम राबवून ग्रामपंचायतीने सर्वोत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्यांच्या या यशस्वी कामगिरीसाठी ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी परिश्रम घेतले. त्यांच्या या यशात ग्रामपंचायतस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीच्या सदस्यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

ग्रामस्तर अभियानाच्या प्रसार, प्रसिध्दी, जनजागृती व सर्वांच्या क्षमता बांधणीसाठी खोलापूर ग्रामस्तरीय महा आवास अभियान कार्यशाळा ग्रामपंचायत कार्यालयात घेण्यात आली. या कार्यशाळेला सर्व ग्रामस्थ, लाभार्थी, सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, तलाठी, तालुकास्तरीय अधिकारी व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता उपस्थित होते. या कार्यशाळेचे आयोजन व सादरीकरण ग्रामसेवक व तलाठी यांनी केले.

"महा आवास अभियान २०२१-२२" अंतर्गत उदिष्टपूर्तीसाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत आवास योजनांतर्गत ग्रामपंचायतमध्ये घरकुले मंजूर करून त्या सर्व घरकुलांचे बांधकाम नियोजित कालावधीत पूर्ण केले. घरकुलांचे प्रस्ताव करण्यासाठी सरपंच व ग्रामसेवक यांनी स्वतः लाभार्थ्यांच्या घरी जावून त्यांना प्रोत्साहन केले. तसेच कागदपत्र पूर्ततेसाठी मेळावे आयोजित करून लाभार्थ्यांनी आवश्यक ती कागदपत्रे ग्रामपंचायतीकडे सादर केली. त्यानुसार परिपूर्ण प्रस्ताव तयार करुन तालुकास्तरावर सादर करताच सर्व प्रस्तावांना तात्काळ मंजूरी देण्यात आली.

परंतु गावामध्ये १०५० भूमिहीन लाभार्थी ही सर्वांत मोठी अडचण घरकुल बांधकामासाठी होती. याकरीता स्वतः सरपंच व ग्रामसेवक यांनी गावात पहाणी करून गावात २१९ भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध करून दिली. त्यामुळे घरकुल लाभार्थ्यांचा जागेच्या अडचणींचा प्रश्न मार्गी लागून सर्व घरकूले शौचालयासह व इतर नागरी सुविधासह पूर्ण झाली. या लाभार्थ्यांना हक्काचे पक्के घर मिळाल्याने सर्व लाभार्थी आनंदाने स्वतःच्या घरात वास्तव्य करत आहेत.

सद्याही गावामध्ये घरकुल बांधकामासाठी जागा नसलेले घरकुल लाभार्थी मोठ्या प्रमाणात असून यावर ग्रामपंचायतस्तरावरून उपाय योजना करण्याचे काम प्रगतीत आहे. ग्रामस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार वितरण सोहळा ग्रामपंचायत खोलापूर येथे आयोजित करून ग्रामस्तरीय पुरस्कार विजेत्यांना सरपंच यांच्या शुभहस्ते व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. परंतु राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार देवून ग्रामपंचायतीला गौरविल्याने सर्व ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.





# सर्वोत्तम कामगिरीसाठी जालना जिल्ह्याचा राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्काराने गौरव

जालना जिल्ह्याचे जुने नाव जालनापुर असे होते. मराठवाड्यातील कुंडलिका नदीच्या काठी वसलेले हे शहर व्यापारी केंद्र म्हणून महत्त्वाचे स्थान आहे. या शहरात अमृतेश्वर मंदिर, बारव असुन आनंदी स्वामी मंदिर, दत्त मंदिर पहायला मिळतात. तसेच मस्तगड किल्ला, जैनुल्ला शाह (मिया सहाब) दर्गा, वेशी ही जालना शहराचे आकर्षण आहे. जालना जिल्ह्यात अंबड, बदनापुर, भोकरदन, घनसावंगी, जाफराबाद, जालना, मंठा व परतुर हे ८ तालुके आहेत.

"महा आवास अभियान २०२१-२२" या अभियान कालावधीत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचे मूल्यमापन करून राज्य पुरस्कृत आवास योजना मधील संख्यात्मक प्रगतीनुसार सर्वोत्तम कामगिरीसाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जालना यांची 'महा आवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार' सर्वोत्तम जिल्हा म्हणून प्रथम क्रमांकाच्या पुरस्कारासाठी राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती मार्फत निवड करण्यात आली.

त्यांच्या या सर्वोत्तम कामगिरीसाठी महाराष्ट्र राज्याचे मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री.गिरीष महाजन यांच्या शुभहस्ते व मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. एकनाथ डवले व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक २३ नोव्हेंबर, २०२३ रोजी राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार स्वरूप प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्हे देवून गौरविण्यात आले.

जालना जिल्ह्याच्या या उल्लेखनिय कामगिरीचे श्रेय जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती वर्षा मिना, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री.शिरीष बनसोडे, जिल्हा प्रोग्रामर श्री.सय्यद मिन्हाज अली व जिल्हा डेटा एन्ट्री ऑपरेटर श्री.श्याम वैजिनाथ डोलस यांना जाते. तसेच याकामी जिल्हास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती सदस्यांचे विशेष सहकार्य लाभले.

जालना जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत आवास योजनां मध्ये विविध उपक्रम राबवून **५ ३ भूमीहीन लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता, १३,१२८ घरकुलांना मंजूरी, ७,००१ मंजूर घरकुलांना पहिल्या हफ्त्याचे वितरण, ३०४८ घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण, १,७७७ प्रलंबित घरकुले** (Delayed Houses) **पूर्ण व ३१५ ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले.**

**त्याचप्रमाणे विविध शासकीय योजनांशी कृतीसंगम करुन लाभार्थ्यांना** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मधून ३२२ मनुष्य दिवस रोजगार, स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण मधून २,४६८ शौचालये, जल जीवन मिशन मधून २,१९९ घरांना नळाने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, प्रधानमंत्री उज्ज्वला योजने मधून २,१७० गॅस जोडणी, सौभाग्य योजने मधून १,९६० विद्युत जोडणी, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियाना मधून १,६८० उपजिविकेचे साधन, इ. शासकीय योजनांचा लाभ देण्यात आला. तसेच अभियान कालावधीत विविध नावीन्यपूर्ण उपक्रम जिल्ह्यात राबवून घरकुल बांधकामासाठी वाळूला पर्याय वापरुन २१० घरकुलांची निर्मिती व २१५ मॉडेल हाऊसेसची उभारणी करण्यात आली.

अभियान कालावधीत शासकीय जागा उपलब्ध करुन देणेबाबत महसूल व विकास शाखेच्या अधिकाऱ्यांच्या वेळोवेळी बैठका घेतल्या असून जागा उपलब्ध करून देणे साठी सर्वस्तरावर पाठपुरावा केला.पंडीत दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, ग्रामीण भागातील शासकीय जागांवरील निवासी अतिक्रमणे नियमानुकूल करुन प्राधान्याने भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करणे. तसेच गायरान जमीनी सार्वानिक हितासाठी प्राप्त करुन भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे बाबत सातत्याने प्रयत्न सुरू आहे. तसेच जिल्ह्यात सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावर बैठका, क्षेत्रीय भेटी व मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

जिल्हास्तरीय महा आवास अभियान २०२१-२२ पुरस्कार वितरण सोहळा मा.पालकमंत्री, जालना श्री.अब्दुल सत्तार यांच्या शुभहस्ते व जिल्हाधिकारी श्री.विजय राठौड़, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय स्वातंत्र्य दिनी दिनांक १५ ऑगस्ट, २०२२ रोजी जालना येथे घेण्यात आलाय





# महा आवास अभियान मध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी नाशिक विभागाला द्वितीय क्रमाकांचा राज्यस्तरीय पुरस्कार

नाशिक विभागात नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव व अहमदनगर जिल्ह्यांचा समावेश आहे. नाशिक विभाग नोट (भारतीय चलन) प्रेस, धार्मीक स्थळे, नद्या, गड, किल्ले, द्राक्ष व केळी याकरीता प्रसिध्द आहे. नाशिक विभागीय आयुक्तांचे कार्यालय मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, नाशिक रोड, नाशिक येथे आहे. विभागीय आयुक्त हे महसूली प्रमुख आणि जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदांचे नियंत्रक आहे. तसेच विकास आणि प्रशासकीय बाबींसाठी शासनाकडून नेमण्यात आलेल्या विविध विभागस्तरीय समित्यांचे ते प्रमुख असतात.

"महा आवास अभियान २०२१-२२" या अभियान कालावधीत राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे मूल्यमापन करून केलेल्या सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग यांची 'महा आवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार' सर्वोत्कृष्ट विभाग म्हणून प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मध्ये द्वितीय क्रमांकाच्या पुरस्कारासाठी राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती मार्फत निवड करण्यात आली आहे.

त्यांच्या या सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी महाराष्ट्र राज्याचे मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री.गिरीष महाजन यांच्या शुभहस्ते व मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. एकनाथ डवले व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक २३ नोव्हेंबर, २०२३ रोजी राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार स्वरूप प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले.

नाशिक विभागाच्या या उल्लेखनिय कामगिरीचे श्रेय विभागीय आयुक्त, श्री. राधाकृष्ण गमे, उपायुक्त (विकास), श्रीमती उज्वला कोळसे, सहाय्यक आयुक्त (विकास) श्री.मनोजकुमार चौधर व विभागीय प्रोग्रामर श्री. मोहम्मद ओवैस सिद्दिकी यांना जाते. तसेच याकामी विभागस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीचे सदस्यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

नाशिक विभागातील सर्व अंमलबजावणी यंत्रणेच्या अभियान क्षमता बांधणीसाठी नाशिक विभागाची विभागस्तरीय महा आवास अभियान २०२१-२२ कार्यशाळा सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या उपस्थितीत दूरदृष्य प्रणालीव्दारे घेण्यात आली. या कार्यशाळेचे आयोजन व सादरीकरण उपायुक्त (विकास) यांनी केले. विभागीय आयुक्त यांनी सर्व उपस्थितांना अभियाना विषयी मार्गदर्शन व उद्दिष्टपूर्तीचे नियोजन केले.

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी तसेच गुणात्मक प्रगती व्हावी, याकरीता दिनांक २० नोव्हेंबर, २०२१ रोजी राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधुन राज्यात 'महा आवास अभियान-ग्रामीण' राबविण्यात आले. या अभियाना मध्ये राज्यात विविध उपक्रम राबवून अभियान कालावधीत जास्तीत जास्तीत लाभार्थ्यांचे घरकुले पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले होते. या अभियानामुळे नाशिक विभागातील लाखो ग्रामीण भागातील लोकांचे स्वतःच्या घराचे स्वप्न पूर्ण झाले. महा आवास अभियान हा शासनाचा खरोखर कौतुकास्पद उपक्रम असून या अभियानाच्या यशस्वतेसाठी आवश्यक मार्गदर्शन व सुचना नाशिक विभागाकडून नियमित करण्यात आल्या.

अभियान कालावधीत मी स्वतः शासकीय जागा उपलब्ध करुन देणेबाबत महसूल व विकास शाखेच्या अधिकाऱ्यांच्या वेळोवेळी बैठका घेतल्या असून जागा उपलब्ध करून देणे साठी सर्वस्तरावर पाठपुरावा केला.पंडीत दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, ग्रामीण भागातील शासकीय जागांवरील निवासी अतिक्रमणे नियमानुकूल करुन प्राधान्याने भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करणे. तसेच गायरान जमीनी सार्वजनिक हितासाठी प्राप्त करुन भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे बाबत सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे विभागीय आयुक्त, श्री. राधाकृष्ण गमे यांनी सांगितले.

विभागस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार वितरण सोहळ्याचे विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक येथे आयोजन करून पुरस्कार विजेत्यांना विभागीय आयुक्त यांच्या शुभहस्ते प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.






# महा आवास अभियान मध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी पुणे विभागाला द्वितीय क्रमांकाचा राज्यस्तरीय पुरस्कार

पुणे विभागात पुणे, सातारा, सांगली, सोलापूर व कोल्हापूर जिल्ह्यांचा समावेश आहे. पुणे विभाग धार्मीक स्थळे, नद्या, गड, किल्ले, वाडे व पुणेरी संस्कृती याकरीता प्रसिध्द आहे. पुणे विभागीय आयुक्तांचे कार्यालय विधान भवन (कौन्सिल हॉल), कॅम्प एरिया, पुणे येथे आहे. विभागीय आयुक्त हे महसूली प्रमुख आणि जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदांचे नियंत्रक आहे. तसेच विकास आणि प्रशासकीय बाबींसाठी शासनाकडून नेमण्यात आलेल्या विविध विभागस्तरीय समित्यांचे ते प्रमुख असतात.

"महा आवास अभियान २०२१-२२" या अभियान कालावधीत राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे मूल्यमापन करून केलेल्या सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग यांची 'महा आवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार' सर्वोत्कृष्ट विभाग म्हणून प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मध्ये द्वितीय क्रमांकाच्या व राज्य पुरस्कृत आवास मध्ये तृतीय क्रमांकाच्या पुरस्कारासाठी राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती मार्फत निवड करण्यात आली आहे.

त्यांच्या या सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी महाराष्ट्र राज्याचे मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री.गिरीष महाजन यांच्या शुभहस्ते व मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. एकनाथ डवले व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक २३ नोव्हेंबर, २०२३ रोजी राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार स्वरूप प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले.

पुणे विभागाच्या या उल्लेखनिय कामगिरीचे श्रेय विभागीय आयुक्त श्री. सौरभ राव, उपायुक्त (विकास) श्री.विजय मुळीक, सहाय्यक आयुक्त (विकास) डॉ. सोनाली घुले व विभागीय प्रोग्रामर श्री. आप्पासाहेब जाधव यांना जाते. तसेच याकामी विभागस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीचे सदस्यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

पुणे विभागाची विभागस्तरीय महा आवास अभियान २०२१-२२ क्षमता बांधणी कार्यशाळा घेण्यात आली असून या कार्यशाळेला विभागातील सबंधीत सर्व अधिकारी/कर्मचारी व्हिडिओ कॉनफरन्सिंगच्या माध्यमातून उपस्थित होते. या कार्यशाळेचे आयोजन व सादरीकरण उपायुक्त (विकास) यांनी केले. विभागीय आयुक्त यांनी सर्व उपस्थितांना अभियानाच्या यशस्वतेसाठी मार्गदर्शन व सुचना दिल्या.

महा आवास अभियान २०२१-२२ या अभियानामुळे अनेक विकासाची कामे करण्यास उत्तेजन मिळते व त्यातून पुढे जाण्याची प्रेरणा मिळत आहे. प्रत्येक व्यक्तीला हक्काचे घर मिळावे हे आपल्या देशाचे मा.प्रधानमंत्री यांचे स्वप्न आहे. कोणतीही व्यक्ती हक्काच्या घरापासुन वंचित राहता कामा नये याकरीता प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या माध्यमातून वंचितांना हक्काचे घर मिळवून देण्यासाठी सामुहिक प्रयत्न केले जात आहे. तसेच केंद्राच्या या योजनेला जोड देण्यासाठी राज्य पुरस्कृत विविध योजना राबविल्या जात आहेत. पुणे विभाग हा राज्यातील सर्वात जास्त प्रगत विभाग आहे. लोकप्रतिनिधींचा विकासोन्मुख दृष्टीकोन असल्याने लोकप्रतिनिधी व स्थानिक प्रशासकीय अधिकारी हे सहकार्याच्या भावनेतून एकत्र येवून काम करतात, अशा सक्रीय सहभागामुळेच महा आवास अभियानामध्ये यश संपादन केले असल्याचे विभागीय आयुक्त श्री. सौरभ राव यांनी सांगितले.

कोरोना महामारीच्या आपत्तीमध्ये देखील सर्वांनी एकजुटीने काम केले. अशी सकारात्मक उर्जा यापुढेही ठेवुन पुणे विभागात शासनाच्या सर्व योजनांमध्ये काम करण्यात येईल. तसेच विभागामध्ये महा आवास अभियान राबविण्यापुर्वी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत आवास योजना योजनेमध्ये काम झाले होते. महा आवास अभियानामध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरी व्यक्ती किंवा संस्था यांना विभागस्तरीय पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करून गौरविण्यात आले. पुणे विभागाला राज्यस्तरीय पुरस्कार देवून गौरविल्याच्या मला अभिमान असून याकरीता पुणे विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन करत भविष्यात अशीच कामगिरी करण्यासाठी शुभेच्या श्री.सौरभ राव यांनी दिल्या.





# महा आवास अभियान मध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी कोकण विभागाला प्रथम क्रमाकांचा राज्यस्तरीय पुरस्कार

कोकण विभागात ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांचा समावेश असून हे सर्व जिल्हे महाराष्ट्राच्या किनारपट्टीचे, अत्यंत निसर्गरम्य आहेत. यामुळे येथे निसर्ग प्रेमेंची कायम रेलचेल असते. कोकण विभागीय आयुक्तांचे कार्यालय कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई येथे आहे. विभागीय आयुक्त हे महसूली प्रमुख आणि जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदांचे नियंत्रक आहे. तसेच विकास आणि प्रशासकीय बाबींसाठी शासनाकडून नेमण्यात आलेल्या विविध विभागस्तरीय समित्यांचे ते प्रमुख असतात.

"महा आवास अभियान २०२१-२२" या अभियान कालावधीत राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे मूल्यमापन करून केलेल्या सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग यांची 'महा आवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार' सर्वोत्कृष्ट विभाग म्हणून राज्यपुरस्कृत आवास योजनांमध्ये प्रथम क्रमांकाच्या पुरस्कारासाठी राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण वमूल्यमापन समिती मार्फत निवड करण्यात आली आहे.

त्यांच्या या सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी महाराष्ट्र राज्याचे मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री.गिरीष महाजन यांच्या शुभहस्ते व मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. एकनाथ डवले व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक २३ नोव्हेंबर, २०२३ रोजी राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार स्वरूप प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले.

कोकण विभागाच्या या उल्लेखनिय कामगिरीचे श्रेय विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर, उपायुक्त (विकास) श्री. गिरीश भालेराव, सहाय्यक आयुक्त (विकास) श्री. नितीन मंडलिक, विभागीय प्रोग्रामर श्रीमती सोनाली महाबरे यांच्यासह विभागस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती सदस्यांना जाते.

कोकण विभागाची विभागस्तरीय महा आवास अभियान २०२१-२२ क्षमता कार्यशाळा विभागातील सबंधीत सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या उपस्थितीत व्हिडिओ कॉनफरन्सिंगच्या माध्यमातून घेण्यात आली. या कार्यशाळेचे आयोजन व सादरीकरण उपायुक्त (विकास) यांनी केले. विभागीय आयुक्त यांनी सर्व उपस्थितांना अभियानाच्या यशस्वतेसाठी आवश्यक मार्गदर्शन व सुचना केल्या.

राज्यातील सर्व प्रशासकिय यंत्रणा मार्च २०२० पासुन कोविड 19 साथरोगाशी लढत असल्यामुळे विकास कामांच्या अंमलबजावणीमध्ये अडचणी येत असताना, राज्यात दिनांक २० नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून 'महा आवास अभियान २०२१-२२' चा शुभारंभ करण्यात आला. 'सर्वांसाठी घरे-२०२४' या शासनाच्या धोरणानुसार ग्रामीण भागातील वंचित घटकांना त्यांचे हक्काचे पक्के घर मिळवुन देण्यासाठी शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनेचा एक घटक म्हणुन पाठपुरावा करताना कामाचे समाधान लाभले.या अभियानातील उद्दिष्टपुर्ती व अभियानाच्या यशस्वीतेसाठी कोकण विभागातील सर्व अधिकारी, पदाधिकारी व कर्मचारी अत्यंत हिरीरीने व झोकुन देऊन सहभागी झाले. प्रशासकीय अधिकाऱ्यांना व पदाधिकाऱ्यांना विकास कामे करताना जिल्हा परिषद, पंचायत समिती मधील मोठया आव्हानांना सामोरे जावे लागते. या सर्वांवर मात करुन अधिकारी व पदाधिकारी आपली भुमिका उत्कृष्ट बजावून आपली ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा व विभाग अव्वल आणण्याचा प्रयत्न केला, हे खरंच कौतुकास्पद असून अधिकारी व पदाधिकारी यांच्या सुसंवादामुळे ग्रामीण गृहनिर्माणाच्या कामात सकारात्मक वातावरण तयार होवुन हे मोठे कार्य उभे झाले असल्याचे विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी सांगितले.

कोविड 19 मुळे आलेली भिती व मरगळ झटकुन देऊन योजना राबविण्यासाठी प्रशासकिय यंत्रणेस गतीमान करणेसाठी या अभियानाची मदत झाली आहे.कोकण विभाग नेहमीच शासकीय योजना राबविण्याबाबत आघाडीवर असतो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे कोकणातील आदर्श व सुंदर गावे आहेत. कोकण विभागात डोंगराळ, अति दुर्गम व आदिवासी क्षेत्रात देखील अभियानाची प्रभावी अंमलबजावणी होऊन वंचित घटकां योजनेचा कमी कालावधीत लाभ मिळणेस मदत झाली. अशाच सकारात्मक उर्जेने कोकण विभागात सर्व शासकीय योजनांमध्ये काम करणार असल्याचे मत डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी व्यक्त केले.





# फोटो गॅलरी




उदयसिंगजी राजपूत
यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत समिती


अमृत महाआवास अभियान २०२२-२३
तालुकास्तरीय पुरस्कार वितरण




मा.आ.डॉ. रत्नाकररावजी गुट्टे






जिल्हा परिषद,
पंचायत समिती,
स्वातंत्र्याचा अमृत

# मिडीया कवरेज

## घरकूल योजनेत जिल्ह्यास चार पुरस्कार

दोन ग्रामपंचायतींचा पुरस्कारात समावेश

सोलापूर : पुढारी वृत्तसेवा

केंद्र व राज्य पुरस्कृत घरकूल योजनांच्या अंमलबजावणीत गतिमानता, गुणवत्ता आणण्यासाठी राज्यात महाआवास अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानात सोलापूर जिल्ह्यास राज्यात ४ पुरस्कार मिळाले. त्यात दोन ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

सन २०२१-२२ मध्ये राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे पुरस्कार वितरण व सन २०२३-२४ महाआवास अभियानचा शुभारंभ कार्यक्रम मुंबईत ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, संचालक राजाराम दिघे आदी उपस्थित होते.

सोलापूर जिल्ह्यास पुणे विभागामध्ये संख्यात्मक दृष्टीने सर्वात पान २ वर

सोलापूर : ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते महाआवास योजनेचे पुरस्कार स्वीकारताना प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे, सर्फराज शेख आदी.

## ‘महाआवास’मध्ये जिल्ह्याला तीन राज्यस्तरीय पुरस्कार

ग्रामविकासमंत्र्यांच्या हस्ते सीईओ, प्रकल्प संचालकांना पुरस्काराचे वितरण

पोही, खोलापूर ग्रामपंचायत राज्यात तिसऱ्या क्रमांकावर

पुण्य नगरी / प्रतिनिधी

अमरावती : महाआवास योजनेअंतर्गत अमरावती जिल्ह्याला राज्यस्तरावरील तीन पुरस्कार देण्यात आले आहे. याशिवाय अंजनगाव सुर्जी तालुक्यातील पोही आणि भातकुली तालुक्यातील खोलापुर ग्रामपंचायतीला राज्यस्तरावरील पुरस्काराचे वितरण ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते करण्यात आले.

मुंबई येथे गुरूवारी पुरस्कार वितरण सोहळा थाटात पार पडला. पुरस्कार स्विकारताना सिईओ अविश्यांत पंडा, डीआरडीएच्या प्रकल्प संचालक प्रिती देशमुख, भातकुली बिडीओ प्रफुल्ल बोरखडे, अंजनगाव बिडीओ विनोद खेडकर, जिल्हा प्रोग्रामर भुषण उमक, ऑपरेटर राहुल टापरे यांची उपस्थिती होती. महाआवास पुरस्कारामध्ये जिल्हा परिषदेला भूमिहीन लाभार्थींना जागा उपलब्ध करण्यात राज्यातुन प्रथम, भौतिकदृष्ट्या घरकुल पूर्ण करण्याला देखील प्रथम पुरस्कार देण्यात आला. घरकुल मार्ट करीता राज्यातुन तृतीय पुरस्कार जिल्हा परिषदेला मिळाला आहे. तसेच उत्कृष्ट ग्रामपंचायतीमध्ये अंजनगाव सुर्जी तालुक्यातील पोही आणि भातकुली तालुक्यातील खोलापुर ग्रामपंचायत राज्यातुन तिसऱ्या क्रमाकावर आली आहे. त्यामुळे सदरचे पुरस्कार गूरूवारी मुंबई येथे वितरीत करण्यात आले.

## महाआवास अभियान राज्य स्तरीय कार्यशाला का उद्घाटन एवं पुरस्कार वितरण समारोह

## महाआवास अभियानाच्या अंमलबजावणीतून लाभार्थ्यांच्या घरकुलाचे स्वप्न पूर्ण होणार ग्रामविकास व पंचायत राज मंत्री गिरीश महाजन

महाआवास अभियान राज्यस्तरीय कार्यशाळा शुभारंभ व पुरस्कार वितरण सोहळा

## घरकुलाचे उद्दिष्ट पूर्ण केल्याबद्दल सीईओ वर्षा मीना यांचा मुंबईत गौरव

जालना (प्रतिनीधी) : प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत जालना जिल्ह्यात ६ हजार ६७० घरकुलांना मंजुरी देऊन शंभर टक्के उद्दिष्ट पूर्ण केल्याबद्दल जालना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या अध्यक्ष श्रीमती वर्षा मीना यांचा आज गुरुवारी मुंबई येथे राज्य शासनाच्या वतीने राज्याचे ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते स्मृती चिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या महाआवास अभियान २०२३ - २४ राज्यस्तरीय कार्यशाळेचा शुभारंभ आज गुरुवारी मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन आणि अन्य मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. या कार्यक्रमात सन २०२१-२२ या वर्षात प्रधानमंत्री महाआवास योजने अंतर्गत उत्कृष्ठ कामगिरी करणाऱ्या संस्था आणि व्यक्तींचा सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. जालना जिल्हा परिषदेने सदर वर्षात राज्य पुरस्कृत आवास योजनेंतर्गत जालना जिल्ह्यात ६ हजार ६७० घरकुलांना मंजुरी देऊन शंभर टक्के उद्दिष्ट साध्य करत प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर ६ हजार २३६ घरकुल मंजूर करून बुलढाणा जिल्हा परिषदेने द्वितीय क्रमांक पटकावला असून ३ हजार ५०७ घरकुल मंजूर करून जळगाव जिल्हा परिषदेने तृतीय क्रमांक पटकावला आहे. प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल जालना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या अध्यक्षा श्रीमती वर्षा मीना यांचा ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला आहे. या यशाबद्दल वर्षा मीना यांचे अधिकारी, कर्मचारी आणि सर्वसामान्य जनतेतून अभिनंदन केले जात आहे.

## रिसोड पंचायत समितीला राज्यस्तरीय पुरस्कार

महाआवास घरकुल योजनेतून बहुमजली इमारत; तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

रिसोड, दि. २४ (प्रतिनिधी)

महाआवास अभियानेंतर्गत सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत बांधकाम विभागातील रिसोड पंचायत समिती अंतर्गत लोणी बु. द्वितीय तर गणेशपुर ग्रामपंचायतीला तृतीय पुरस्कार प्राप्त झाला. रिसोड पंचायत समिती अंतर्गत महाआवास अभियान ...

“लाभार्थी आणि आमच्यातील योग्य समन्वयाने तालुक्यातील महाआवास घरकुल योजना योग्य प्रकारे राबविल्या जात आहे. लाभार्थी सुध्दा उत्कृष्ट घरकुल बांधणीसाठी सकारात्मक प्रतिसाद देत आहेत. त्यामुळे रिसोड पंचायत समितीला हा बहुमान शासनाद्वारे प्राप्त झाला आहे.

– अनिल आर. आडे, ग्रामीण गृह निर्माण अभियंता पं.स.रिसोड

## महाआवास अभियानांतर्गत नाशिकला मिळाले राज्यस्तरीय पाच पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

नाशिक : शासन पुरस्कृत प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना आणि राज्य पुरस्कृत आवास योजनेअंतर्गत महाआवास अभियानासाठी नाशिकला राज्यस्तरीय ५ पुरस्कार प्राप्त झाले. त्यात राज्य पुरस्कृतमध्ये १०० टक्के भौतिकदृष्ट्या उद्दिष्टपूर्तीसाठी प्रथम तर घरकुलांच्या उद्दिष्टांप्रमाणे १०० टक्के मंजुरीसाठी द्वितीय स्तराचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. प्रदान करण्यात आलेले हे पुरस्कार जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रतिभा संगमनेरे यांनी स्वीकारले.

केंद्र आणि राज्य पुरस्कृत पुरस्कार हे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. तर शबरी आवास योजनेअंतर्गत सर्वोत्कृष्ट जिल्ह्यांसाठी जि. प. सीईओ, ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक तसेच आदिवासी विकास प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी यांना प्रदान करण्यात आले. त्याशिवाय राज्य पुरस्कृत आवास योजनेसाठी राज्यातील सर्वोत्कृष्ट तालुके हा पुरस्कार कळवणच्या पंचायत समिती प्रशासक तथा गटविकास अधिकारी यांना प्रदान करण्यात आला. तर महाआवास अभियानचा ग्रामीण गृहनिर्माण अभियंता हा विशेष पुरस्कार मालेगावचे गृहनिर्माण अभियंता भूषण ठाकरे यांना प्रदान करण्यात आला.

ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना प्रकल्प संचालक प्रतिभा संगमनेरे. समवेत मान्यवर.

## रमाई घरकुल योजनेत कन्नड पंचायत समितीला राज्यस्तरीय पुरस्कार

कन्नड शहर : महाआवास अभियान २०२१-२२ अंतर्गत प्रधानमंत्री व राज्य पुरस्कृत आवास योजनेत कन्नड पंचायत समितीने राज्यात दुसऱ्या क्रमांचा पुरस्कार मिळविला.

गृहसंकुलने उभारणे, घरकुल तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजेअंतर्गत बहुमजली इमारत व रमाई घरकुल योजनेच्या उत्कृष्ट कामाबद्दल कन्नड पंचायत समितीला हा पुरस्कार देण्यात आला. ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन व राज्याचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांच्या हस्ते जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, कन्नड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकणे तसेच जिल्हा प्रोग्रॅमर सुदेश रोकडे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी विस्तारअधिकारी डोंगरे, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता रामप्रसाद आहेर, नितीन लहाने, सहाय्यक प्रशासन अधिकारी एच.एस.कोलमवार, कल्पेश राठोड उपस्थित होते.

## प्रधानमंत्री आवास योजनेचे जास्त लाभ देणाऱ्या ढवळसरीचा तालुक्यात प्रथम क्रमांक

आमदार प्रताप अडसड यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सत्कार

## ४७० लाभार्थ्यांना मिळणार हक्काचे घर

पालकमंत्री मुनगंटीवार यांची मंजुरी : सहा कोटींचे अनुदान

## ‘मोदी आवास’ योजना : येत्या तीन वर्षातील घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित

## जिल्ह्यात २४ हजार ‘ओबीसी’ लाभार्थ्यांना मिळणार घरकुल!

## तुमच्याकडे घरासाठी जागा नसेल तर जिल्हा परिषद देणार जमीन !

२,१२१ जणांना मिळाला दिलासा; गरिबांच्या घरांचे स्वप्न पूर्ण होणार

## जिल्ह्यात ४,३१६ लाभार्थ्यांना मिळणार घरकुलाचा लाभ

५६ कोटींचे मिळणार अनुदान : बांधकामासाठी प्रत्येकी १.३२ लाख

## ३१० भूमिहीन, बेघरांना मिळाला हक्काचा निवारा

## रमाई आवास योजनेतील ३ हजार ५४९ पात्र लाभार्थ्यांना घरकुल मंजूर

## मोदी आवास घरकुल योजनेसाठी कालबद्ध कार्यक्रम : खिलारी

५ नोव्हेंबरपर्यंत प्रस्ताव सादर करावेत

सातारा, दि. १८ (प्रतिनिधी) - जिल्हा परिषद, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत मोदी आवास घरकुल योजनेसाठी कालबध्द कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. त्यासाठी लाभार्थ्यांनी दि. ५ नोव्हेंबरपर्यंत पंचायत समिती स्तरावर परिपूर्ण प्रस्ताव सादर करावेत, अशा सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर खिलारी यांनी पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना दिल्या.

घरकुलांचे उद्दिष्ट वाटप दि. १८ ऑक्टोबरपर्यंत करण्यात येणार आहेत. पंचायत समिती स्तरावर दि. १० नोव्हेंबरपर्यंत आलेल्या प्रस्तावांची छाननी व प्रत्यक्ष स्थळाची पडताळणी करण्यात येणार आहे. दि. १५ नोव्हेंबरपर्यंत पात्र लाभार्थी प्रस्ताव उद्दिष्टानुसार जिल्हा समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येणार असून आवास सॉफ्टवेअरवर नोंदणी केली जाणार आहे. दि. २० नोव्हेंबरपर्यंत जिल्हा समिती मान्यता व ऑनलाइन मंजुरी देण्यात येईल. त्याचबरोबर लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे वितरण करून घरकुलांचे काम सुरू करण्यात येणार असल्याचे श्री. खिलारी यांनी सांगितले.

जिल्ह्यासाठी इतर मागास प्रवर्गासाठी २०२३-२४ साठी १६८५, २०२४-२५साठी १६८५ तर २०२५-२६ साठी २२४८ तर विशेष मागास प्रवर्गासाठी २०२३- २४ साठी ९२, २०२४-२५ साठी ९३, २०२५- २६ साठी १२३ घरकुलांचे उद्दिष्ट असल्याची माहिती जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक संतोष हराळे यांनी दिली.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या माध्यमातून विविध योजनांमधून घरकुले उपलब्ध करून देण्यात येत आहेत. मोदी आवास योजनेच्या माध्यमातून इतर मागास व विशेष मागास प्रवर्गासाठी घरकुले देण्यात येणार आहे. जिल्ह्यात या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कालबध्द कार्यक्रमानुसार तंतोतंत कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

ज्ञानेश्वर खिलारी, मुख्य कार्यकारी अधिकारी

## नांदेड जिल्ह्यातील २७० ग्रामसेवकांना निलंबनाची नोटीस

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुल बांधकाम संथगतीने

## जिल्ह्यात ८५ टक्के घरकुले पूर्ण

राज्यात जिल्हा दहाव्या क्रमांकावर

## घरकुलांसाठी लाभार्थ्यांनी दलालाच्या भुलथापांना बळी पडु नये - डॉ तुबाकले

## अपूर्ण घरकुले महिनाभरात पूर्ण करण्याचे आदेश

१२० लाभार्थ्यांची लोक अदालतीत सुनावणी; ३१ डिसेंबरनंतर गुन्हे दाखल करण्याचा गटविकास अधिकाऱ्यांचा इशारा

## लाभार्थ्यांनो घरकुल बांधा, अन्यथा अनुदान परत करा!

देऊळगाव राजा तालुक्यातील १३४ लाभार्थींना दिली नोटीस

## आवास लाभार्थियों को प्रमाणपत्र वितरित

## पंचायत समितीला अति. मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांची भेट

## अबब नांदेड जिल्ह्यात १७ हजार घरकुलांचे पैसे घेऊन काम ठप्प

## पोलिस बंदोबस्तात पैसे वसुल करणार : डॉ तुबाकले




महा आवास अभियान २०२३-२४ राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळे प्रसंगी मा.संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे अभियाना विषयी सादरीकरण करतांना




महा आवास अभियान २०२३-२४ राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळे प्रसंगी मा.सचिव, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, श्री.के. टि. पाटील यांचे स्वागत करतांना मा.संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे



महा आवास अभियान २०२३-२४ राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळे प्रसंगी मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, डॉ. महेंद्र कल्याणकर यांचे स्वागत करतांना मा.संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे




महा आवास अभियान २०२३-२४ राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळे प्रसंगी मा.विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, श्रीमती. विजयलक्ष्मी बिदरी यांचे स्वागत करतांना मा.संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे

“महाराष्ट्र शासनाचा एकच ध्यास,
राज्यातील सर्वांसाठी आवास”




**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
दुरध्वनी क्र. - ०२२ - २७५६१८२४, महा आवास हेल्पलाईन क्रमांक - १८०० २२ ०१९
ई-मेल - directoriayruralhousing@gmail.com, वेबसाईट - www.mahaawaas.com